श्रीदत्त प्रसन्न.

गुलेबकावली—उर्फ

कुसुमचंपा संगित नाटक.

हें पुस्तक

बाबाजी दौलतराव राणे,

राजापुरकर मंडळीचे मालक.

यांनीं रचिलें तें

मुंबईत:—'इंदुप्रकाश' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

आवृत्ति. ३ री.

हें पुस्तक रजिष्टर करून सर्व प्रकारचे हक्क कर्त्यानें आपले स्वाधीन ठेविले आहेत.

सन १९१२.

किंमत ~~[illegible]~~. 2-0

१२७१_२

हें पुस्तक घर नंबर ४३४, ठाकुरद्वाररोड,—मुंबई येथें इंदुविजयकंपनीच्या "इंदुप्रकाश" छापखान्यांत मालकांकरितां रा. रा. दामोदर सांवळाराम यंदे, यांनीं छापिलें; व रा. रा. बाबाजी दौलतराव राणे, यांनीं मुंबई येथें प्रसिद्ध केलें.

विनंति.

गुलेबकावली नामक एका कादंबरीच्या आधारानें हें पुस्तक लिहिलें आहे, हें आम्ही वाचकांना आधींच सांगून ठेवतों. मूळचेंच कथानक असंभाव्य असल्या-मुळें त्याची छाया यांत उतरणें हें आश्चर्य नव्हे, तरी पण होतां होईल तों असंभाव्य गोष्टी सोडून नाटकाच्या सोईकरतां व मनोरंजनाकरतां कथानकांत थोडीशी फिरवाफिरव केली आहे. जनमनोरंजनार्थ मीं अल्पबुद्धीनें केलेली ही सेवा माझे बंधु-भगिनी गोड करून घेवोत, ही विनंति आहे.

या नाटकांतील भाषणाचे कामीं व कांहीं पद्यें सुधारून, कांहीं नवीन रचल्या-बद्दल श्रीयुत **वासुदेव नळिकंठ आगटे,** हें पुस्तक वाचून वेळोवेळीं योग्य सूचना केल्याबद्दल श्रीयुत **रामचंद्र यशवंत केसकर,** एडिटर **प्रमोदसिंधु** मु० उमरावती, श्रीयुत **त्र्यंबक अवधूत देऊळगांवकर,** मु० पातुर (**वऱ्हाड**), श्रीयुत **दत्तात्रय सीताराम रणदिवे** मु० कारंजा (वऱ्हाड), **यांचे** तसेच आपापल्या भूमिका उल्हासानें योग्य रीतीनें बजाऊन हें नाटक रंगभूमीवर आणल्याबद्दल **राजापूरकर** नाटक मंडळींतील **नटवर्ग,** या सर्वांचे **मी** मना-पासून आभार मानतों.

बाबाजी दौलतराव राणे.

हें **कुसुमचंपा**-पुष्प श्रीदत्तचरणीं अनन्यभावानें अर्पण केलें आहे.

बा० दौ० राणे—ग्रंथकर्ता.

या नाटकांतील पात्रें.

सूत्रधार—नाटकाचार्य.
नटी—त्याची स्त्री.
अतिपीड—चंडधारानगरीचा राजा.
चौघे राजपुत्र—अतिपीड राजाच्या आवडत्या राणीचे पुत्र.
जयसेन—त्याच्याच नावडत्या राणीचा पुत्र. (नायक.)
तारा—अलकावतीच्या राजाच्या राखेची कन्या.
चंपा—एक यक्षकन्या. (नायिका.)
दयाळराव—तारेचा सेवक.
गजरा—तारेची दासी.
पुष्पावती—राक्षसांनीं हरण केलेली एक राजकन्या.
हम्माली—कुसुमचंपा पुष्पाची रक्षक राक्षसी.
हिंडिबासुर—तिचा पती.

शिवाय—शिपाई, हमाल, पहारेकरी, आंधळा, (पुढें जयसेनाचा प्रधान) चंपेच्या सख्या, कैदी, राजपुत्रांना पकडणारे सेवक, इत्यादि.

श्रीदत्तप्रसन्न.

कुसुमचंपा संगीत नाटक.

नान्दी.

पद (भूप—ब्रह्मताल.)

श्री गुरुवर नरहरपद अधि नमितों ॥ भावें गुण गाउनि ॥ श्री० ॥ त्रिभुवनीं भक्तजन-स्मरणीं ॥ प्रेमें नेमें धांवें पावें ह्मणोनि ॥ सुर-नर-मुनि भजनिं रमुनि तराति भवाब्धित ॥ श्री० ॥ मग नमीं तात गुरु जननी । चित्तीं प्रीती मोठी मी ती धरोनी । अति मतिहीन कवन करुनि अर्पित चरणीं ॥ श्री० ॥

पद (मम नमन हें रमावर रामा)

श्रीपाद श्रीवल्लभ नरहरि । अनसूयात्मज श्रीकृष्णातिरिं ॥ औदुंबरतरुतळीं विराजे ॥ तत्स्मरणीं दुरितें तीं सारीं ॥ भर भर भर भर पळती क्षणाभीतरीं ॥ जनां पीडिती भूतें बहुपरी ॥ तीर्थोदक शिंपितां भयानें ॥ थर थर थर थर कांपत पळात सत्वरीं ॥ तो श्रीगुरु या नाट्यरंगणीं ॥ स्फूर्ती देवो मज नवकवनीं ॥ गड गड गड गड लोळुनि विनंती करी ॥

सूत्र०—कां ? अजून इथंचशा ? सर्व सिद्धता झाली वाटतं ?

नटी—ती तर केव्हांच झाली आहे, पण मनांतून कांहीं बोलायचं—

सूत्र०—मग बोला, बोला. एवढा संकोच कां ?

नटी—म्हटलं, एकदां तेवढी मुलाची पत्रिका करून घ्यायची होती.

सूत्र०—कां ? आजच कांहीं अडलं आहे ?

नटी—तसं नव्हे, आज उद्यां करतां करतां दिवस वाढत चालले—आणि—

सूत्र०—बस. बस.—

पद (हरि हर ब्रह्मा,)

उठाठेव ही भलभलती तूं नित्य अशी कां करिशी ॥ परी प्रसंगीं अशा गुणांनीं नाना व्यसनीं पडशी ॥ मनाला येई तसें कर जा ॥ तुजला प्रतिबंध न माझा ॥

नटी—कधीं कांहीं विचारा, सरळ उत्तर ह्मणून नाहींच. मेलं आमचं बायकांचं जिणं निव्वळ परतंत्र. देवा—

पद (बहु ऐक्य वाढो,)

स्त्रीजन्म खोटा कां दिधला रे व्यर्थ आह्मां जगतीं ॥ शब्दसुखाचा पुरुष न देती दासीसम गणिती ॥ वृथा सायास, तुवां केलास, अशा जन्मास, दिलें आह्मांस ॥ कीं ज्यास मानिति हे जन चिर्चीं कांहिं न किस्मत ती ॥

सूत्र०— झालं. जरा मनाविरुद्ध बोललं कीं, सर्व तंत्र बिघडलं, आणि त्य दैवाला ओढलंच पुढं. हें बघ, ज्या गोष्टी घडायच्याच म्हणून परमेश्वरानं ठरवित त्या कधींही टळायच्या नाहींत. मग तुह्मी पत्रिका करा किंवा कांहीं करा. होणा तें चुकायचं नाहीं.

नटी—तर मग पत्रिका करीवतात, ते लोक वेडेच म्हणायचे ?

सूत्र०—यांत काय संशय ?

पद (जो मनुज भक्षी,)

तव मनिंचि भ्रांति दे सोडुनी । नवनाटक हें आजि पाहुनी ॥
सौख्यदुःख तें प्राक्तनयोगें । मिळतें मनुजा जाण सखे गे ॥
त्यांत शुभाशुभ बघणें नलगे । सकलां अनुभव हा जनीं ॥

नटी—या अशा शास्त्रांतल्या ठरींव वचनांनीं माझी कांहीं समजूत व्हायची नाहीं.

सूत्र०—आणि म्हणूनच तुझ्या डोक्यांतलं हें पत्रिकेचं वेड घालविण्याकरितां मीं या आजच्या नाटकाची योजना केली आहे.

नटी—म्हणजे ? मी नाहीं समजलें.

सूत्र०—अशी इथं आड उभी रहा आणि हा चंडधारानगरीचा प्रधान इकडेच येत आहे, त्याचे उद्गार लक्ष देऊन ऐक; म्हणजे तुझीच खात्री होईल कीं,—

साकी.

जन्मपत्रिका करुनी किंवा सामुद्रिक चिह्नांनीं ।
भावी संकट निकट ये असें सांगितलें जोशांनीं ।
जातक वर्तवुनी । तरिही न चुके जय–हानि ॥

प्रवेश १ ला.

स्थळ–राजवाडा. (प्रधान व चौघे राजपुत्र).

प्रधान—परमेश्वरा काय ही तुझी लीला ! आमच्या महाराजानीं आपल्या धाकट्या पुत्राचं मुखावलोकन करतांच ते अंध व्हावे, आणि त्यामुळं आज सतत बारा वर्षे आम्ही–या चंडधारा नगरीच्या लोकांनीं दुःखांत काळ घालवावा, अशी तुझीच इच्छा होती काय ? देवा, तूं इतका निष्ठुर कां झालास ? तुला करुणा तरी केव्हां येणार ? बरं, चौघे राजपुत्र तरी राजकार्यदक्ष असावेत, तर तेंही नाहीं. अकलेचं आणि त्यांचं, म्हणजे जन्माचें वैर. पांचवा पुत्र जयसेन, हा सर्वगुणसंपन्न आहे म्हणतात; पण त्या बिचाऱ्याच्या कपाळीं त्याच्या दुर्दैवानं वनवास भोगण्याचं आलं आहे. बरोबरच आहे, चंद्र जसा प्रसन्न, सर्वांगसुंदर व शीतल आहे, तरी त्याला कलंक आहे. त्याप्रमाणें बा जयसेना, तुझ्या

कीर्तीला हा कलंकच आहे. असो. आज एका वैद्यानं एक उपाय सांगितला आहे, तो तरी करून पहावा. पण इतका कठीण व धाडसाचा उपाय करणार कोण ? मोठा विचार येऊन पडला आहे. (चौघे राजपुत्र येतात.)

१ रा०—कां प्रधानजी, विचार कसला चालला आहे ?

२ रा०—आंधळ्या बाबांना फसवूनं राज्य कसं गिळंकृत करावं हाच.

प्रधान—अहाहा ! काय पण बाळांच्यां तोंडांतून मुक्ताफळं पडलीं. (उघड) अहो महाराज, असले अभद्र विचार माझ्या मनांत कधींही यायचे नाहींत आणि माझी तशी दुष्ट इच्छाही नाहीं.

३ रा०—तुमची जर चांगली इच्छा आहे, तर अजून आमच्या बाबांचे डोळे कां बरे होत नाहींत ?

४ रा०—अरे, बाबा आंधळे असण्यांतच यांचा फायदा आहे.

१ रा०—तो कसारे बोवा ?

२ रा०—अरे, असं पहा, बाबांना कांहीं राज्यकारभार पाहतां येत नाहीं.

३ रा०—किंवा यानीं कोणत्या कामांत किती पैसे चावले, हें समजत नाहीं.

४ रा०—अर्थातच प्रधानजी सांगतील तें प्रमाण व करतील ती पूर्वदिशा.

प्रधान—सरकार, आपण काय वाटेल तें म्हणा, पण महाराजांचं अंधत्व दूर करण्याबद्दल माझे सारखे प्रयत्न चालू आहेत.

१ रा०—प्रयत्न चालू आहेत ? मग कुठें दिसत नाहींत ते ?

प्रधान—कां बरं ? आजपर्यंत किती तरी राजवैद्य, मंत्री, बैरागी, पंचाक्षरी वगैरे आणले, पण कांहीं उपयोग झाला नाहीं; त्याला काय करायचं ?

२ रा०—काय करायचं ? उपयोग नाहीं झाला तर मग आणले होते कशाला ?

३ रा०—अरे, पंचपक्वान्नं झोडायला.

४ रा०—आणखी वर लागेल तितकं द्रव्य लांबवायला.

प्रधान—ऐकून तर घ्या. आज एका वैद्यानं एक उपाय सांगितला आहे-

१ रा०—मग उशीर कां ? चटदिशीं करून टाका.

प्रधान—पण तो उपाय साध्य व्हायला धाडसी, शूर व चतुर मनुष्य पाहिजे.

२ रा०—मग मी आहें धाडसी. सबंध लाडू गट्ट करतों पटदिशीं.

३ रा०—आणि मी आहें शूर. सहज करतों हुर तर चिमण्या उडतात भुर.

४ रा०—आणि मी आहें चतुर. मांजर करतों फितुर, तर उंदीर होतात चिंतातुर.

१ रा०—थांबारे. बरं पण तो उपाय काय तो सांगा पाहूं प्रधानजी ?

प्रधान—उपाय हाच कीं, कुसुमचंपा-पुष्प त्यांच्या डोळ्यांना लावलं पाहिजे

२ रा०—मग विलंब कां ? लावा.

प्रधान—अहो, आणल्याखेरीज लावा काय ?

३ रा०—मग तें आह्मांला दाखवा कीं, आणलंच समजा.

प्रधान—अहो, दाखिवल्यावर आणायला आपणच नको. कोणीही आणील.

१ रा०—असे कसे हो तुम्ही प्रधान ? कोणतंच काम तुमच्या हातून होत नाहीं म्हणजे ? बरं चला, तें फूल कोणत्या ठिकाणीं सांपडेल तें तरी सांगा.

प्रधान—पूर्वप्रदेशांत चंपावती नामक कोणी यक्षकन्या राहते, तिच्या बागेंत तें फूल आहे असं म्हणतात.

२ रा०—असं म्हणतात नि तसं म्हणतात ! तुम्हांला पक्की माहिती कांहींच नाहीं.

प्रधान—नाहीं कां ? यक्षकन्येनं त्या पुष्पाच्या रक्षणार्थ हजारों राक्षस व क्रूर श्वापदं ठेवलीं आहेत. त्यांच्या तडाक्यांतून निभावून तें फूल आणायचं म्हणजे फार कठीण आहे.

३ रा०—त्यांत हो काय कठीण ? इथं घोड्यावर बसायचं आणि थेट त्या यक्षकन्येच्या बागेंत जायचं.

४ रा०—म्यानांतून शस्त्र काढायचं आणि त्या राक्षसांचं डोकं उडवायचं.

१ रा०—घोड्यावरून उतरायचं आणि बेलाशक बागेंत शिरून फूल तोडायचं.

२ रा०—पुनः घोडयावर बसायचं आणि गेल्या वाटेनं परत यायचं. यांत काय कठीण दिसलं बोवा तुम्हाला ?

प्रधान—हें सर्व बोलायला सोपं आहे, पण चांगला पोक्त विचार करा.

राज०—यांत कसला विचार ?

पद (राम करी जरि,)

विचार दुसरा कोण करीतो ॥ मेघापरि आम्हीं चौघें जातों ॥ गिरिकंदरिं-जनिं-वनीं शोधितों ॥ पुष्प अमोलिक तें ॥ पवन-गतीनें चौदा भुवनें ॥ नभःप्रदेशीं खगरूपानें ॥ दाहि दिशा धुंडाळुनि यत्नें ॥ आणूं पुष्प क्षणीं ॥ स्वर्ग मृत्यु पाताळ फिराया ॥ दुःख न मानूं झिजवूं काया ॥ ताताकरितां प्राणहि द्याया ॥ सिद्ध आह्मी झालों ॥

प्रधान—इतकं करायला आपण तयार असल्यावर मग हो काय पाहिजे ? चलावं. महाराजांकडून मी आपल्याला परवानगी देववितों. (प्रधान जातो.)

१ रा०—आपण पुढं व्हा. अरे ए, पण सगळेच जाऊन उपयोग नाहीं. महाराजांच्या वृद्धापकाळीं त्यांच्याजवळ कोणी तरी पाहिजे. म्हणून मी एकटाच जातों.

२ रा०—छे, छे, छे, तूं आहेस थोर. तेव्हां तूंच पाहिजेस नेहमीं त्यांच्या समोर. मीच जातों आणि सगळी पृथ्वी उलथी पालथी करून हां हां म्हणतां तें फूल घेऊन येतों.

३ रा०—पुरे, पुरे, रावसाहेब, पृथ्वी उलथी पालथी करण्याची अंगांत शक्ति असती, तर परवांच्या लढाईत आपली तिरपिट कां उडाली असती ? जेव्हां कां घोडा लागला पळायाला, तेव्हां यांनीं मिठी मारली त्याच्या गळ्याला. शेवटीं हे गेले तळाला आणि घोडा यांच्यावर स्वार झाला. त्या वेळीं मी होतों मदतीला ह्मणून हे रडतराऊत आले सुखरूप घराला; तेव्हां हा नको, मी एकटाच जातों.

४ रा०—कशाला ? तूं म्हणजे आळशांचा शिरोमणि. खायला गोणीच्या गोणी आणि प्यायला पखालभर पाणी. एकदां घुसले आंथरुणीं कीं लागली झोंप कुंभकर्णी, तेव्हां आपण जाऊन तिथं काय करणार करणी ? मीच जातों.

१ रा०—तूं तरी काय ध्वज लावणार आहेस ? अरे, याचा पराक्रम ऐकाल तर पोट धरधरून हंसाल. परवां शिकारीच्या वेळीं एका कोल्ह्याच्या पिल्लाला वाघोबा समजून हा माझ्या मागं लपून बसला. पण मी न घाबरतां त्या कोल्ह्याला ठार केला आणि आपला पराक्रम जगाला दाखविला. यासाठीं तुम्ही कोणी जाऊं नका. मीच जाणार. ('मी जाणार, मी जाणार' असें म्हणत भांडत जातात.)

प्रवेश २ रा.

स्थळ-राजमहाल. (राजा, प्रधान, राजपुत्र, सेवक इत्यादि.)

राजा— **पद** (तस्करा हातीं,)

अंध मी ऐसा । नेत्रद्वयिं ह्मणुनी ॥ सजिव परि मृत झालों भुवनीं ॥ राज्यलक्ष्मी हें, वैभव बहु असुनी ॥ मला तें दुःखद होत मनीं ॥ अखिल सौख्याला । गेलों मी मुकुनी ॥ वदन हें दाउं कसें सुजनीं ॥ व्याघ्र हो जैसा । बंदिमधें पडुनी ॥ तसा मी पुसाति न मज कोणी ॥

प्रधानजी, माझ्या हातून असं कोणतं पाप घडलं, म्हणून मी हें दुःख भोगतों आहें ?

प्रधान—महाराजानीं असं धैर्य सोडूं नये. आज सकाळीं सांगितलेल्या वैद्याच्या औषधानं खास गुण येईल, अशी माझी मनोदेवता सांगते.

राजा—छे, छे, मला तर त्यांत कांहीं अर्थ दिसत नाहीं.

पद (सारखें शौर्य माझें,)

यत्न होति निष्फल तरि ते करितसां कशाला ॥ दृष्टि येई पुनरपि ऐसी आस उरे याला ॥ कालकूट विष द्या आतां

मजसि प्राशण्याला ॥ भयद भुजगाकरवीं कर वपूला ॥ तप्त तैल करुनी त्यानें स्नान मजसि द परी अंधत्वाचें अधिक हो मनाला ॥

प्रधान—महाराजांनीं असं निराश होऊं नये. निदान ह करण्याला मला परवानगी द्यावी.

राजा—ठीक आहे. पण अशीं संकटं सोसून तें फूल को

प्रधान—आपल्या चौघां शूर पुत्रांनीं तें काम करण्याचा

राजा—अहाहा! माझ्या विषयींची ही त्यांची कळकळ आनंद वाटतो. कुठें आहेत ते?

प्रधान—हे पहा इकडेच येत आहेत. (राजपुत्र येता सरकार, निश्चय कायम झालाना?

१ रा०—पण प्रधानजी, अगोदर आमचा न्याय करा. मी

२ रा०—मी म्हणतों मी जाणार.

३ रा०—मी म्हणतों मी जाणार.

४ रा०—आणि मी म्हणतों मी जाणार. तेव्हां जावं को

प्रधान—हं, हं, हं, असे भांडूं नका. तुम्हीं चौघांनींहि अशी मी महाराजांकडून परवानगी काढली आहे. (स्वगत) अशी भांडाभांडी तर पुढं रडारडीच दिसते आहे.

चौघे—हें आपल्याला पसंत आहे. चला तर महाराजांची

प्रधान—हे पहा. आपली मार्गप्रतीक्षा करीत बसले आहे

चौघे—नमस्कार करतों. आम्हीं परवानगी मागण्याकरित

राजा—बाळांनो, या बसा. माझ्याकरितां इतके श्रम करण झालांत, ही तुमची पितृभक्ति पाहून मला फार आनंद होत लाडक्यांनो, वाटेनं तुम्हांला फार ताप होईल रे!

१ रा०—आम्ही डेरे, राहुट्या बरोबर घेणार आहोंत. त्यांतून कधीं बाहेरच पडणार नाहीं, मग कसला ताप ?

राजा—व्याघ्रसिंहादि हिंस्र पशूंपासून तुम्हांला फार त्रास होईल.

२ रा०—आम्ही सेनापतींना सांगून ठेवूं कीं, तसले ते द्वाड पशू आमच्या तंबूशेजारी अगदीं फिरकूं देऊं नका म्हणून, मग कसला त्रास ?

राजा—जंगलांतून, पहाडांतून फिरतांना तुमचे फार हाल होतील.

३ रा०—आम्हीं जंगलांतून, डोंगरांतून मुळीं फिरणारच नाहीं. मोठमोठ्या सुंदर सुंदर शहरांतून हिंडूं, मग कसले हाल ?

राजा—यक्षकन्येच्या बागेंतून फूल आणतांना त्या राक्षसांशीं तुम्हांला युद्ध करावें लागेल, आणि तुम्ही तर—

४ रा०—हंः युद्धांत काय आहे ? आम्ही तें तेव्हांच करून टाकूं. आम्ही सर्व केवळ शौर्यधैर्याचे सागर आहोंत. तुम्ही अंधळे आहांत म्हणून, नाहीं तर तुम्ही सुद्धां 'हो' म्हणालां असतां. आमचा पराक्रम तुम्ही नाहीं पाहिला, पण जाऊं द्या. आतां सर्व सांगत बसायला वेळ नाहीं. आतां आम्हांला जायला परवानगी द्या म्हणजे झालं.

राजा—ठीक आहे. तुमचा हा उत्साह पाहून मला पुनः दृष्टि येईल, अशी आशा वाटते. बाळांनो, पुष्प मिळवून लवकरच परत या बरं.

चौघे—हो हो. आठ दिवसांच्या आंत, त्यांतहो काय आहे ?

राजा—बाळांनो, मला एकदां कडकडून भेटा बरं. (भेटतात) परमेश्वरा, माझ्या लाडक्यांना यशस्वी करून लवकरच सुखरूप परत आण. मुलांनो तुम्हांला सांगतों तेवढं ध्यानांत धरा—

पद (नादर दर दीम,)

मानिं धरा मम वच दृढ आपुलें । जपुनि नित्य तुम्हि रहा रे
सगळे । सुमार्ग सोडुनि कुपथिं न जाणें । सुजन म्हणाति

बरवें तें करणें । प्रवासदुःखचि प्राक्तनिं आलें । ह्मणुनि जपुनि नित रहा० । मत्कुलदीपक तुह्मि चौघेही । जातां परि मजजवळि न कुणिही । अंध तात तुमचा हा देहीं । तळमळ करितो रात्रंदिन रे । यास्तव परतुनि ह्मणिं या झालें ॥

चौघे—महाराज, आपण सांगितल्याप्रमाणें आम्ही अगदीं एक विचारानें वागत जाऊं बरं. आमच्याविषयीं आतां अगदीं काळजी करूं नये.

राजपुत्र—　　　　**पद** (अबला घात,)

आंवरुनि प्रेमपाश पितया । ह्मणीं द्या आज्ञा निज तनयां ॥ अंगीं धैर्य थोर याया । सुखानें प्रवास कंठाया ॥ आशिर्वाद असावा आपुला तोच येइ कामीं ॥ अवनि फिरोनी पुष्प आणुनी सुखवुं तुह्मां आह्मी । पराक्रम दाऊं जगता या ॥

(जातात.)

प्रवेश ३ रा.

स्थळ–जंगल रस्ता. (जयसेन, शिपाई, हमाल इ०)

जय०—　　　　**पद** (सार्थचि ते वदती,)

जन्मुनि मी जगतीं । वाटे । निज जननीला कष्ट दिले अति । गतजन्मीं जें मत्करिं घडलें । तेंच पाप हें उदया आलें । म्हणुनि पित्यानें मज त्यागियलें । मज्जन्माची झाली माती ॥

शिव, शिव ! राजकुलांत जन्म घेऊन, नानाप्रकारचे पराक्रम करण्याऐवजीं मी एखाद्या निर्धन मनुष्याप्रमाणें वनवासांत दिवस काढीत आहें, तरी देखील

मला माझ्या हतबलतेची शरम वाटूं नये ? असा कसा मी राजकुलकलंक दिवटा जन्मास आलों ? परमेश्वरा, जन्मतांच आपल्या मातापित्यांला दुःख देणारा पुत्र निर्माण करण्याला, तुला मीच तेवढा सांपडलों काय ? अरे ! पण हे कोण लोक इकडे येत आहेत बरं ?

हमाल—अरं देवारं ! आतां ह्ये वजं मी कसं न्हेऊं ! (बोजा टाकून बसतो.)

शिपाई—मुकाट्यानं उचल, नाहीं तर चांगलाच मिळेल खाऊ.

जय०—अहो शिपाईबुवा, हें ओझं फार जड आहे हो. तो बिचारा पट्कन मरून जाईल.

शिपाई—मग तें कोण त्याचा बाप नेईल ?

जय०—बरं पण काय हो, हा एवढा लवाजमा तरी कुणाचा ?

शिपाई—चंडधारा नगरीच्या अतिपीड राजाचे चौघे पुत्र प्रवासाला निघाले आहेत, त्यांचा.

जय०—त्यांना प्रवासाचं काय बरं कारण ?

शिपाइ—आमच्या महाराजांना जयसेन नांवाचा एक मुलगा होता; तो इतका अपेशी होता कीं, त्याचं तोंड पाहिल्याबरोबर आमचे महाराज अंध झाले. त्यांना गुण येण्याकरितां हजारों उपाय केले. शेवटीं काल एका वैद्यानं सांगितलं कीं, कुसुमचंपा नांवाचं फूल त्यांच्या डोळ्यांना लावलं असतां गुण येईल. तेव्हां त्या फुलाच्या शोधार्थ हे राजपुत्र निघाले आहेत. पण तुमच्याशीं जास्त बोला-चला मला वेळ नाहीं. चलारे हमालांनो.

जय०—शिपाईबुवा, आपल्याजवळ माझी एक विनंति आहे.

शिपाई—अझून आपली विनंति आहेच का ? बोला झट्दिशीं पाहूं.

जयसेन—आपल्या या सैन्यांत नोकरी करावी अशी माझी फार इच्छा आहे.

शिपाई—चला तर, तुमच्या योग्यतेप्रमाणंच तुम्हांला आमचे जमादार नोकरी देतील. चला. (जातात.)

जय०—हर हर ! माझं नांव उच्चारतांना देखील लोक अपेशी हें विशेषण लावतात. परमेश्वरा, यापेक्षां मला जन्मतांच कां मरण दिलं नाहींस ? पण असं हातपाय गाळीत बसणं बरं नव्हे. माझ्या चौघां बंधूंनीं पितृप्रेम जागृत ठेवून आपले देह प्रवासामध्यें झिजवावे आणि मी मात्र या निर्जन वनामध्यें आकाशाकडे तोंड करून दैवाला नांव ठेवून अश्रु गाळावे ! छे, छे. इतःपर असें कधींही होणार नाहीं. मीही आपल्या बंधूंबरोबर जाणार. कर्मधर्मसंयोगानं महाराजांच्या सुखाला कारण मीच कशावरून नाहीं होणार ?

पद (पुनरपि नयनां,)

विश्वपते तव अघटित घटना । नुमजे कधिं कवणा । जगन्नायका अनुभव तो कां । नच दाविसि दीनां । कठिण असे संकट मजवरिचें । भंग कराया संगत आपली । दे मज श्रीरमणा ॥

प्रवेश ४ था.

स्थळ—अलकावती नगराचा राजमार्ग. (चौघे राजपुत्र व दयाळराव.)

१ रा०—अबबब ! केवढं हें भव्य नगर ! मला वाटतं, कांहीं दिवस या नगरांत चैनीनं फिरावं आणि नंतर फुलाच्या शोधाला जावं, कसं रे ?

२ रा०—अरे पण चैनबाजीची कांहीं तरी शक्कल काढा, नुसतं भटकण्यांत काय फायदा ?

३ रा०—फायदा असो नसो. आपला तर बोवा भटकण्याचाच कायदा.

४ रा०—आणि त्या फुलाचा वायदा ? तो चटूकन जाईल टळून आणि वाट पाहतां पाहतां महाराज जातील पटूकन मरून.

१ रा०—अरे, फक्त चार आठ दिवस फिरण्यांत घालवायचे. तितक्या अवकाशांत कांहीं महाराज नाहीं मरायचे.

२ रा०—आतां असे नुसते विचार करीत बसाल तर पुरते फसाल. कदाचित् याच नगरांत तें फूल कशावरून नसेल ?

३ रा०—म्हणूनच फिरायला चला, म्हणजे आपोआप दिसेल.

४ रा०—हो ! म्हणजे अनायासें प्रवासाची तरी दगदग चुकेल.

१ रा०—(पुढें होऊन) अरे बापरे ! केवढा तरी अवाढव्य वाडा हा ! पण काय रे ? ती सज्जावर कोण बरं बसली असावी ?

२ रा०—मला वाटतं, ती स्वर्गलोकची अप्सरा असावी.

३ रा०—अथवा मृत्युलोकची नायकीण कशावरून नसावी ?

४ रा०—मग चला, कशी काय आहे ती जाऊन तरी पहावी.

१ रा०—अरे, पण हा दरवाज्याजवळ नगारा कशाला ?

२ रा०—शिवाय त्याच्या शेजारीं कायसासा लेखही आहे लिहिलेला.

३ रा०—तर मग थांबा. मी जातों वाचायला. (वाचून हंसत येतो.)

४ रा०—अरे, तुला इतका हर्षवायु कशाचा झाला ?

३ रा०—बाबारे, हा वाडा एका सुंदर नायकिणीचा आहे नायकिणीचा !

१ रा०—होय का ? मग देवच पावला म्हणायचा ?

२ रा०—तर मग करा विचार आजची रात्र इथंच घालवायचा.

३ रा०—पण हें कांहीं दहा पांच रुपयांचं ठिकाण नव्हे. इथं सव्वालाख रुपयांचा ढीग रचावा, नगारा वाजवावा आणि नंतर पुढचा विचार करावा, असं आहे.

१ रा०—अं. सव्वा सोडून अडीच लाख.

२ रा०—अडीच सोडून तीन लाख.

३ रा०—तीन सोडून चार लाख.

४ रा०—चार सोडून पांच लाख. कारण, आम्ही कोण आहोंत ?

पद (रजपुतांच्या स्त्रिया,)

पराक्रमी ऐश्वर्ययुक्त हे राजपुत्र आह्मी ॥ श्रेष्ठ कुलिं जन्म होय आमुचा ॥ लाभ या गणिकासंगतिचा ॥ घेऊं चला तिच्या धामीं ॥ होऊं दंग रंगमहालीं ॥ दैवें सुबक संधि आली ॥ नंतर गुंतूं निजकामीं ॥

(नगारा वाजवितात. इतक्यांत दयाळराव येतो.)

दया०—कोणीं नगारा वाजिवला ?
१ रा०—यानं वाजविला.
२ रा०—मी नाहीं, यानं वाजिवला.
३ रा०—नाहीं नाहीं, यानं वाजिवला.
४ रा०—कां बरं ? आह्मीं सगळ्यांनीं वाजिवला.
दया०—तर मग पांच लाख रुपये काढा.
१ रा०—हात्याच्या ही घ्या माझी सव्वालाख रुपयांची काठी.
२ रा०—त्याच्यावर ही माझी दीडलाखांची अंगठी.
३ रा०—त्याच्यावर ही पावणेदोन लाखांची हातांतली पेटी.
४ रा०—या सगळ्यांच्यावर ही माझी दोन लाखांची कंठी.
५ रा०—ठीक आहे. चला. (सर्व जातात.)

प्रवेश ५ वा.

स्थळ—तारेचा महाल. (तारा, दयाळराव, राजपुत्र, दासी:)

दया०—हं हं बाईसाहेब, चला आटपा लौकर! हे घ्या पांच लाख रुपये आणखी करा तयारी. (काठी, पेटी व कंठी देतो.)

तारा—अरे तयारी कसली? आणखी या इतक्या मौल्यवान् जिनसा कोणाच्या?

दया०—आज चार राजपुत्र आपल्या घरीं आले आहेत. आपल्या नियमाप्रमाणें नगाऱ्यावर थाप मारून ही रकमेची भरपाई केली आहे. चला आटपा लवकर. आतां इतक्यांत ते द्यूत खेळायला येतील.

तारा—बरं पण कायरे, त्यांच्यांत एकादा रूपवान्, गुणवान् आणि शूर कोणी दिसला का तुला?

दया०—त्यांच्या रूपाविषयीं ह्मणाल, तर शिंगें आणि शेंपूटच कमी, बाकी खुपसुरत. विचार न करतां एकदम अशा मौल्यवान् जिनसा माझ्या अंगावर फेंकून दिल्या, यावरून गुणांची पारख सहजच होते. 'नगारा कोणी वाजविला?' असं मी दरडावून विचारतांच सगळेच भेदरून गेले. यावरून शूर किती आहेत तेंही समजा.

तारा—बरं, तूं आंतील दिवाणखान्यांत खेळाची तयारी कर जा.

(जातो व राजपुत्र येतात.)

१ रा०—अहाहा! ही वेश्या तर केवळ सौंदर्याची पातळी आहे.

२ रा०—मूर्खा, पातळी नव्हे, पितळी आहे.

३ रा०—अरे दशमूर्खा, पितळी नव्हे, सुतळी आहे.

४ रा०—अरे शतमूर्खांनो, पातळी नव्हे, पितळी नव्हे, सुतळी नव्हे, तर सौंदर्याची पुतळी आहे, पुतळी.

तारा— पद (असे कां तुम्ही,)

अहो रंगलाल या हो या ह्मणीं। विनंती करी दासी लीन होउनी। झालें दंग मी तुह्मां पाहुनी। आनंदे मनी गेली गुंग होउनी। माझें भाग्य थोर ह्मणोनी तुह्मी। दान दासी-सदनीं

आलों चालुनी । असे या बसा इथें येउनी । च्चर
ती घ्या मानुनी ॥

१ रा०—छे, छे. गंणिके, इतका आग्रह करण्याचं कार
तूं नुसतं बसा म्हणालीस कीं, आम्ही तेव्हांच लोळायला लागूं

तारा—बरं महाराज—

पद (तोरे खलचल है,)

तुह्मि जन्मुनियां कोण कुला, भूषविलें भूपतीला,
मजसि महाराज ॥
रा०—चंडधारा नगराधिपती, तत्पुत्र शुद्धमती
परिस तूं आज ॥

तारा०—धन्य धन्य झालें मि धालें स्वमनिं आ
रा०—ये ये न कांहीं तूं धरिं मनिं लाज ॥
तारा—पुरवाल काज तरी नाहीं नाराज ॥
रा०—वाहवा वा, वाहवा वा, वाहवा वा, वाहवा

तारा—महाराज, आतां सर्वांनीं या सुखासनावर बसावं,
प्रमाणं होईल. (स

१ रा०—वाहवारे वाहवा ! ही रूपानं रंभेलासुद्धां लाजव
अंगीं कितीतरी लीनता ही ! छे, छे, छे. गणिके, तूं आमचा
आह्मीच तुझा अत्यादर करतों.

तारा—भलतंच कसं होईल ? आपला सत्कार करावा, हा अ
२ रा०—ठीक आहे. तर मग पंहिल्यानंदां मसालेदार छान
३ रा०—आणि ते आपल्या गोंडस हातानं आमच्या मुख
४ रा०—तसंच नानातऱ्हेचं अत्तर आणून त्यांत आह्मांल

१ रा०—तें झाल्यावर आपल्या सुस्वर नृत्य गायनानं आमचं मन शांतवा.

दया०—(स्वगत) का खेटरं मारीत धिंड काढवा ?

२ रा०—बस वेसं असंच. पहिल्यानं गा आणि थोडांसा नखराही करा.

तारा—दयाळराव, अरे हे चौघेही महामूर्ख दिसतात.

दया०—श्रीमंतांचीं मुलं बहुधा अशींच असतात.

तारा—बरं तर पहिल्यानं थोडंसं गायन करतें.

३ रा०—थोडंसं कां ? चालूं द्या. आम्हांला कंटाळा येईपर्यंत चालूं द्या.

४ रा०—आम्हांला अगदीं गाण्याचं अजीर्ण होऊं द्या.

१ रा०—आम्ही पुरें म्हटलं तरी थांबूंच नकां.

२ रा०—आपलं समाधान झाल्याखेरीज पुरें म्हणूंच नका. चला करा सुरू.

तारा— पद (दरसन बिन,)

जगिं धन्य खरे नर ते सगळे। सुशिल चतुर ज्यां युवति मिळे। मन्मथसादृश पति रतिसम स्त्री। प्रेमगुणें जणुं बांधियलें। दुष्ट नरां परी सगुणी ललना। नियत करी विधि काय चळे ॥

चौघे०—शाबास! शाबास!! शाबास!!!

पद (केरव्याचे चालीवर.)

वाहवा अजब रंग हा फार। या रमणीच्या मधुर गायनीं झालों गारेगार। स्वर्गामध्यें अप्सरसांचा गानीं बहु बाडवार। परी तयांना लाजवोनि तूं झालिस आम्हां प्यार। अभिनयकौशल्यीं तूं आम्हां दिधलासी भ्रमार। नयनशरानें हृदय विंधिलें झालों आम्ही ठार ॥

दयाळ०—महाराज, गाणं ऐकून आपण फार खुष झालांसे दिसता ?

१ रा०—तें कांहीं विचारूं नका. मी अगदीं आनंदसमुद्रांत पोहूं लागलों आहें.

२ रा०—मी तर त्यांत गटांगळ्या खाऊं लागलों आहें.

३ रा०—मी अगदीं पार त्याच्या तळाशीं गेलों आहें.

४ रा०—छेः बोवा, आपण तर त्याच्या अगदीं बाहेर राहिलों आहें. पण या नुसत्या गाण्यांत काय अर्थ आहे? पुढचा बेत कायतो ठरवा. कसं दयाळराव!

दया०—कसं काय? पुढील कृत्याचा इथं आहे निराळाच कायदा.

१ रा०—मग त्याला कशाला पाहिजे वायदा? झटदिशीं बोला म्हणजे तुमचाच होईल फायदा.

दया०—तर मग ऐका. आमच्या बाईसाहेबांशीं द्यूत खेळावं, त्यांना जिकावं आणि आजन्म दासी करून घ्यावं.

२ रा०—अरे वाः! आज हा मोठा अलभ्य लाभच म्हणायचा!

दया०—थांबा थांबा. असे हुरळूं नका. उलटपक्षीं—

३ रा०—उलट नको आणि पक्षी नको; हें आम्हांला कबूल आहे.

दया०—कबूल काय? कदाचित् तुम्ही हरलां तर?

४ रा०—छत्. असं व्हायचंच नाहीं. मग आम्ही राजपुत्र कशाचे?

दया०—पण न जाणों हरलांतच तर तुम्हाला त्यांचें आजन्म गुलाम होऊन रहावं लागेल.

१ रा०—अरे बापरे! नाहीं पण डरायचं काय म्हणून? आहे कबूल.

२ रा०—दादा, तूं वेडा तर नाहींस? अरे द्यूतक्रीडा म्हणजे तंट्याचं मूळ.

३ रा०—अरे पण खेळण्याच्या अगोदरच कां हें तुला खूळ.

४ रा०—अरे वेड्या, द्यूतक्रीडेनें पदरांत पडते धूळ. आणि मग रडावं लागतं मुळमूळ.

१ रा० एकादे दिवशीं खेळलों तर कांहीं होत नाहीं. असं द्यूतक्रीडाशास्त्राच्या पांचव्या अध्यायाच्या सातव्या श्लोकांत रामानं कृष्णाला सांगितलं आहे.

२ रा०—होय का? मग चला तर.

तारा०—बरं पण आपण पणाला काय लावणार?

३ रा०—तुम्हीं काय लावणार?

तारा०—मी आपला देह लावणार. आपणही प्रत्येकांचे देह लावले पाहिजेत.

४ रा०—ठीक आहे. आम्ही आपले देह पणाला लावतों. पाहिजे तर वरो-वरच्या सगळ्या सैन्याचे देह लावतों. त्यांत हो काय?

१ रा०—हें नाहीं आपल्याला कबूल. एका देहाकरता चार देह काय म्हणून? पाहिजे तर याचं डोकं, त्याचं पोट, तुझे हात व माझे पाय हे लावतों पणाला.

२ रा० वाहावारे शहाण्या! चौघांचे चार अवयव लावल्यावर आपण हरलों तर ते त्यांनीं घ्यायचे कसे?

३ रा०—अरे येवढं कसं नाहीं समजत तुला? चौघांच्या चार अवयवावर एक देह तिला देऊं व बाकी उरलेल्याचा एक देह करून फुलाच्या शोधाला जाऊं.

दया०—अक्कलवाटणीच्या दिवशीं गैरहजर होतेसे दिसतात. (उघड) अहो महाराज, जरा माणसांत या. उगीच बहकूं नका. आमच्या बाईसाहेबांनीं जसा आपला देह लावला आहे, तसा तुम्हाला प्रत्येकाला लावायचा असेल तर आंत चला. द्यूतक्रीडेची सर्व तयारी आहे. नाहींतर बाहेर व्हा कसे.

४ रा०—वा:! बाहेर होण्यासाठीं आम्ही आंत आलों वाटतं? देहाची म्हणजे काय बिशाद. आम्ही आपले सर्वांचे देह पणाला लावतों आणि एक घटकेंत आमचं हस्तकौशल्य दाखवितों. (तारा व राजपुत्र जातात.)

दया०—हस्तकौशल्य दाखविणार कां स्वातंत्र्याला मुकणार तें लवकरच दिसेल. अरे मूर्खांनो, द्यूतक्रीडापटू कैक पुरुष जियें लटपटले तिथें तुमच्या-सारख्या अर्भकांची काय कथा! अजून ओठावरचा वाळला नाहीं जार तों निघाले खेळायला जुगार, पण जेव्हां चांगले दांत पडतील, तेव्हां डोळे उघडतील.

ह्मण आहेना, सवाई सोटा भेटे आणि मनचा संशय फिटे. ' ही कोण ? हूँ. ही गजरा इकडेच येत आहे. तर आपण आड उभं राहून ही काय बडबडते तें ऐकावं.

गजरा—कायग बाई तरी आमच्या बाईसाहेबांचं भाग्य हें! कुबेराची संपत्ति इंद्राचं ऐश्वर्य, आणि रतीचं सौंदर्य इतकं सर्व माझ्या सारखीला असतं तर–

दया०—(पुढें होऊन) तर माझ्या सारख्याची खूपच चंगळ उडाली असती

गजरा—कां? आपण इथं सुद्धां अहातच का ?

दया०—जिथं राधा तिथं हरि आणि गजरा तिथं आमची स्वारी.

गजरा—असला चावटपणा मला नाहीं खपायचा.

दया०—मला सुद्धां नाहीं खपायचा. आमसुल्या चेहरा आणि बोलण्याचा पहा केवढा तोरा.

गजरा—अहाहा! तोंडाची उखळी नि नाक लसणीची पाकळी म्हणून बरं.

दया०—बरं बरं. मी हसतों लोकाला नि शेंबूड माझ्या नाकाला आणि मोठी आली आहे मला गोष्टी सांगायला.

गजरा—तुम्हीं सुद्धां नका मला सांगूं. कानावर पगडी नि घरीं बायको उघडी. तशांतली गत.

दयाळ—अरेच्चा ! ही टवळी तर मला बोलूंच देत नाहीं. (जवळ जाऊन) गजरे, अग गजरे, असं काय बरं करतेस ?

गजरा—कसं हो करतें ? पण मी असं विचारतें कीं, तुम्हीं जे एवढे माझ्या नादीं लागलां अहांत ते काय म्हणून ?

दयाळ—तूं नाहीं नाहीं म्हणतेस म्हणून ! एकदां होय म्हण, म्हणजे वादच मिटला आणि खटला तुटला. अहाहा ! गजरे ! काय तुझे हे नांगरांच्या फाळाप्रमाणं सुकुमार दांत, कासवांच्या पाठीप्रमाणं मऊ मऊ गाल, मक्याच्या बुरखुंड्याप्रमाणं चोचीदार नाक—

गजरा—खरंच गडे, हें तुमचं असोल्या नारळाप्रमाणं गुळगुळीत डोकं,

तुराटीच्या खराट्यासारख्या कोवळ्या मिशा, कण्यांप्रमाणं नाक, ढोलक्याप्रमाणं गाल, सुपाप्रमाणं कान--

दयाळ—चल फाजील नाहींतर. (इतक्यांत तारा व राजपुत्र येतात.)

तारा—दयाळराव, चल आटप लवकर.

दयाळ--(भिऊन) नाहीं, नाहीं बाईसाहेब. माझ्याकडे कांहीं अपराध नाहीं. तीच रांड मला म्हणाली, कीं तुझं कण्यांप्रमाणं नाक. ढोलक्याप्रमाणं--

तारा--गप्प बैस. अगोदर या चौघांना ओळीनं उभे करून प्रत्येकाच्या पाठीवर दहा दहा कोरडे चढीव.

१ रा०—म्हणजे ? आम्ही तुझ्याशीं द्यूत खेळलों हा गुन्हा केला कीं काय ? वाहवारे न्याय ! असं असेल तर टाक आमची रक्कम. आम्ही आपले चालते होतों.

तारा०—जातां कुठं ? आजन्म माझे गुलाम होण्याचं कबूल केलं आहेना ?

२ रा०—छत् खोटी गोष्ट. वाटी टाकून नरटी कोण घेईल ? म्हणे राजपुत्र अहांत ते गुलाम व्हा. वाहवारे वाहवा ?

तारा—आतां बऱ्या बोलानं कपडे काढून ठेवतां कीं नाहीं ?

३ रा०--नाहीं ठेवीत. काय करणार तूं आमचं ?

तारा--दयाळराव, दाखिव काय करणार तें. उडीव कोरडे.

४ रा०—अरे बापरे ! तरी मी म्हणत होतों कीं, नको तें द्यूत, आणि नकोत त्या भानगडी. आतां रडा ! रडा ! रडा !

१ रा०—रडून काय होणार ? मोठमोठ्यानं ओरडा ! ओरडा ! ओरडा !

२ रा०—कशाचे ओरडतां ? आतां मुकाट्यानं बंदिखान्यांत पडा ! पडा ! पडा !

दयाळ—पण पहिल्यांदा घ्या एकेक पाठीवर कोरडा ! मग खुशाल रडा, ओरडा, वाटेल तिकडे धडपडा ! (प्रत्येकाच्या पाठीवर कोरडे ओढतो.)

राज०—(कळवळून) **पद** (म्हातारा इतुका,)

मारानें आह्मि जाण । गणिके झालों बहु हैराण । मानिं कांहिं तरी द्रव आण । गणि० । चटचट बसती पाठीवरती चाबुक

ह्मणुनी प्राण । तळमळ करिती जाऊं पहाती तुजविण नच त्यां त्राण । गणि० । निजताताचे अति आवडते पुत्र अह्मी गुणवान । सांपडलों तव हातिं ह्मणोनी न करिं असा अपमान । गणि० । सर्वस्वातें गमवुनि बसलों आह्मां उरलें भान । बक्षिस त्याचें मार पुरे हा विनती इतुकी मान ॥

तारा—एवढ्यानं काय झालं आहे ? पुढचे सुखसोहाळे निराळेच आहेत ?

३ रा०—अग ए मातोश्री ! आतां सुखसोहाळ्यांची मुळींच इच्छा नाहीं. तुला आमचा कंटाळा आला असेल, तर आपल्या घरांतून घालवून दे कशी.

तारा—अंगदीं तुमच्या मनासारखं करतें. दयाळरावं—

पद (ए सरवर बरतर.)

न्या झटकन येथुन, पशुसम बांधुन, कारागृहीं टाका ॥
राजा०—गणिके इतुकें ऐकें । मारानें हैराण । झालों आह्मी जाण । बंदींत टाकून । आतां न दे शीण ।
तारा—आस मनीं ही धरूं नका ॥ न्या० ॥

राज०—तातासि जरि हें वृत्त कळे । प्राणहि त्यजील तो आपुले ॥
तारा—मूर्खांनो आलांत, माझ्या या गृहांत, तेव्हांच मनांत, आलि कशी ही नच शंका ॥
राज०—मूर्ख आह्मि खरे परी । सोड जाउं दे घरीं ॥
तारा—बंदिवास, गृह तुह्मास, दिधलें आतां रडतां कां ॥

(सर्वांना बांधून कारागृहांत नेतात.)

अंक २ रा.

प्रवेश १ ला.

स्थळ—अलकावती नगरचा राजमार्ग, (जयसेन, दयाळराव.)

पद. (वैभव माझें नष्टाचि,)

अनृत साहस मत्सर माया जमवुनियां एके ठायां ॥ कष्ट करोनी निर्मियली कां विरिंचिनें ही स्त्रीकाया ॥ दंभ उदेला मूर्तिमंत कीं अहंकार स्त्री-गड रचिला ॥ सर्व मूर्खपण एकवटोनी मिरास करिते तया स्थला ॥ मोह घनाच्छादित चपला कीं क्रोध ज्वलनाची ज्वाला ॥ स्वरुपाचाही प्रकाश पाडी नरकाचा पथ दावाया ॥

पण त्या गणिकेची निंदा करून तिला दोष देण्यापेक्षां आपले कामांध बंधूच महा-मूर्ख म्हटले पाहिजेत. आतां त्या वृद्ध ब्राह्मणानें सांगितल्याप्रमाणें सावध राहून, या गणिकेला द्यूतांत जिंकून, आपल्या बंधूची सुटका करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. (पुढें पाहून) बोलत बोलत तिच्या महालाजवळच आलों वाटतं ? हो ! हा येथें सव्वा लाख रुपयांबद्दल लेख लिहिलेला आहे, यावरून हाच त्या गणिकेचा वाडा. बरं पण ती सज्यावर कोण बसली आहे ? अथवा संशय कशाला ? माझे चौघे मूर्खशिरोमणि बंधू जिच्या स्वरूपाला भुलून पतंगाप्रमाणें सर्वस्वाला मुकले, तीच ही गणिका. असो. आतां इथल्या रीतीप्रमाणें नगारा वाजवून काय काय प्रकार होतो तो पहावा. (नगारा वाजवितो, तोंच दयाळराव येतो.)

दयाळ०— कां महाराज, नगारा आपणच वाजविला काय ?

जय०—होय. मींच वाजविला.

दया०—तर मग इथल्या नियमाप्रमाणं आपल्याजवळ सव्वालाख रुपये आहेत का?

जय०—ते असल्याखेरीज मी तरी नगारा वाजवीन कां?

दया०—तसं नव्हे. कधीं कधीं टवाळ लोक उगाच जातां येतां नगारा कुटीत बसतात, म्हणून म्हटलं.

जय०—तें बरं केलंत. पण आतां पुढं कसं काय? मला या वाड्याच्या मालकिणीची भेट घ्यायची आहे.

दया०—तर मग सव्वालाख रुपये काढा, म्हणजे भेट करवितों.

जय०—(अंगठी देऊन) हे घ्या. पण कायहो? हे सव्वालाख रुपये दिले, म्हणजे तरी येथील सर्व अटी संपल्या, कीं आणखी कांहीं आहेत?

दया०—अटी कांहीं फारशा नाहींत. फक्त बाईसाहेबांचं मुखावलोकन कराचला सव्वालाख रुपये. नाच, गाणं ऐकायचं असेल तर दहाहजार रुपये आणि विषयसुखाची इच्छा असेल तर—

जय०—तर काय पडतं?

दया०—कांहीं पडत नाहीं. त्यांच्याशीं द्यूत खेळावं, त्यांना जिकावं, आणि विषयसुखांत निमग्न व्हावं—

जय०—आणि एखादे दिवशीं मरून जावं, कीं संपलं. हें पहा, मला नाच, गाणं किंवा विषयसुखाची इच्छा मुळींच नाहीं, फक्त द्यूत खेळायचं आहे.

दया०—तुम्हांला विषयसुखाची इच्छा नाहीं, मग विनाकारण या उपद्व्यापांत कां पडतां?

जय०—पण मी अमूक कां करतों, आणि तमुक कां करीत नाहीं; याची भवति न भवति तुम्ही कां करतां?

दया०—तसं नव्हे. कदाचित् द्यूतांत हरलांत, तर तुम्हाला चाबकाखालीं बडवायचं माझ्या नशिबीं येईल, त्याचं मला फार वाईट वाटतं.

जय०—अरेरे ! तुह्मी फार दयाळु दिसतांहो !

दया०—म्हणूनच माझं नांव दयाळराव.

जय०—तर मग दयाळराव, नशिबीं असेल तें भोगलं पाहिजे, असं म्हणून आपलं दुःख गिळून टाका झालं. काय करणार ? चला. व्हा पुढं. (जातात.)

प्रवेश २ रा.

स्थल—तारेचा महाल. (तारा, गजरा, जयसेन, दयाळराव.)

तारा—अगदीं खरं सांग. दयाळरावाबरोबर तूं काल काय चाहटळपणा चालविला होतासग ?

गजरा—कांहीं नाहीं बाईसाहेब; दयाळरावच मला नाहीं नाहीं तीं नावं ठेवीत होते.

तारा—पण एकांतांत तुला नांव ठेवण्यासारखा असा तुझा त्यांचा घरोबा कधींपासून पडला ? अँ ? मनांतून दयाळरावाला नवरा करून घ्यायचा आहे वाटतं ?

गजरा—मला कशाला नवरा न् बिवरा पाहिजे बाईसाहेब ?

तारा—म्हणजे ? नवरा नको, तर अशीच का राहणार तूं ?

गजरा—हो. अशीच बरी. नवरा करून त्याचीं आर्जवं करा, पांयरूणं धुवा, स्वयंपाक करून वाढा, पाय दाबा, अंग रगडा, अगदीं जन्मभर बटिक होऊन रखडा; त्यापेक्षां वाटेल तेव्हां वाटेल त्याला नवरा करावा, हवे तितके दिवस त्याच्याशीं चैन करावी, कंटाळा आला कीं सोडचिठ्ठी द्यावी. काय सांगूं बाईसाहेब, मला जर देवानं नायकिणीच्या जन्माला घातलं असतं, तर फार चांगलं झालं असतं.

तारा—हा रांडे ! चांगल्या नवऱ्याबरोबर संसार करायची इच्छा सोडून तुला नायकिण का व्हावसं वाटतं ? अग खुळे, या नायकिणीच्या जन्मांत आहे काय ? त्या फक्त बाहेरून सुवर्णकेतकीसारख्या सुंदर, पण अंतर्यामीं कोळशाच्या खाणी. त्यांच्याकडे पैसा घेऊन आंधळा, पांगळा, बहिरा, मुका, सर्वांगीं कुष्ठ भरलेला सुद्धां कोणी येवो; त्याला खुष करण्याकरितां कुरवाळतात, रडतात, हंसतात,

तात्पर्य—विषयसुखाच्या जाळ्यामध्यें त्याला गुंतवून निघेल तितकं द्रव्य काढतात, याला काय प्रेम म्हणावं? अशांच्या जन्माला जाऊन श्रीमंती भोगण्यापेक्षां सद्गुणी पतीला खऱ्या प्रेमानं दैवत समजणाऱ्या साध्वीची बटीक होऊन रहाणं काय वाईट?

गजरा—असं जर म्हणतां, तर तुम्ही आपलं लग्न कां करून घेत नाहीं?

तारा—आजपर्यंत आलेल्या राजपुत्रांत एकसुद्धां सद्गुणी पुरुष मला दिसला नाहीं म्हणून.

गजरा—तर मग या बिचाऱ्यांना कैदेंत घालून यांचे विनाकारण शिव्याशाप कां घेतां?

तारा—परमेश्वरकृपेनं माझ्या मनाप्रमाणं पति मिळाला, म्हणजे त्यांची मुक्तता करीनच. फार तर काय, पण त्यांना महाराजांकडून बहुमानानं पोचतं करवीन.

गजरा—पण असा अक्कलवान् नवरा मिळेपर्यंत, बिचाऱ्या बिनअकली माणसांना तुरुंगांत टाकायचं हा न्याय कुठला?

(दयाळराव व जयसेन बोलत येतात.)

दयाळ०—हा आमच्या घरचा न्याय. यांत आपण मन घालायचं काय कारण?

गजरा—बघा बाईसाहेब, आतां यांना मी विचारायला गेलें होतें का, कीं हा न्याय कुठला म्हणून? पण पहा कसा मुद्दाम चोंबडेपणा करतात तो!

दयाळ०—बाईसाहेब, इला कवडीची तरी अक्कल आहे का? तुम्हीच पहा, हे आपल्याबरोबर द्यूत खेळण्याकरतां पाहुणे आले आहेत. त्यांच्या प्रश्नाला मी उत्तर देतों आहें, आणि ही आपल्याच अंगावर ओढून घेते, हा लुब्रेपणा कुठला?

तारा—(जयसेनास पाहून) बरं बरं, आतां तुम्ही दोघेही इथून चालते व्हा! यावं महाराज; या सुखासनावर बसावं. दयाळराव जा. अत्तर, गुलाब वगैरे घेऊन ये.

जय॰—पण अत्तर, गुलाब, नाच गाणं वगैरे ऐषआराम भोगण्यांसाठीं मी येथें आलों नाहीं.

दयाळ॰—(स्वगत) मग मोक्षसाधनाकरतां इथं आलां कीं काय ? ऐष आराम भोगायचे नाहींत, मग तिकडे मसणवाड्यांत कां नाहीं गेलांत ? नायकिणीच्या घरीं कशाला आलांत ?

तारा—तर मग महाराजि,—

पद. (झिंजोटी–त्रिवट.)

मनीं आणोनी तरि हेतू कोणता । आलां महाराज मद्गृहीं । सांगा विनवी दासि ही । झडकरि आतां ॥ मनीं॰ ॥ सेवा घ्यावी मम करीं । चित्तीं असलें हें जरी । तत्पर आहें मी तरी । शब्दहि निघनां ॥

जय॰—गणिके, तुझ्याकडून सेवा घेण्याकरतां किंवा इतर कामीजनांप्रमाणें विषयसुखाच्या अशापाशांत बद्ध होण्याकरतां मी इथं आलों नाहीं. फक्त तुझ्याशीं द्यूत खेळण्याकारितां आलों आहें.

तारा—पण आपण थकून भागून आलां आहांत, तेव्हां थोडी विश्रांति—

जय॰—छे ! छे ! छे ! द्यूतांत हरल्यावर तुझ्या कारागृहांत अक्षयची विश्रांति आहेच. पण अगोदर—

पद. (मोरे नाजुक,)

मी हुशार म्हणसि द्यूतीं । अमित हरति जन ते मजपुढती ॥ हुशा॰ । म्हणुनि कथित तुज घमेंड मनिंची । त्यजुनि दाव प्रचिति। नयनिं बघति नच व्याघ्र तोंवरी । जंबुक ओरडती ॥ तशी तव ही रीती ॥

दया॰—(स्वगत) अरे बापरे ! याचा तडाखा कांहीं विलक्षणच दिसतो बुवा !

तारा—दयाळराव, हे इतकं निक्षून सांगतात, तेव्हां माझं इंगित तर यांना समजलं नसेल ?

दयाळ०—छट्ट तें काय समजतं ? अहो ' बोलेल तो करील काय आणि गर्जेल तो पडेल काय ? कदाचित् समजलंच, तर हा गृहस्थ चांगला सुस्वरूप व तरुण आहे; आतां गुणांची काय पारख असेल ती आपणच करा. कदाचित् यानं आपल्याला जिंकलं तर सद्गुणी राजबिंड्याची संगत जुडेल, आणि मलाही चांगल्या धन्याची सेवा घडेल. बरं, ही स्वारी जर द्यूत खेळण्यांत नडेल तर आपोआप तुरुंगांत पडेल; आणि कैद्यांचा एक नंबर वर चढेल.

जय०—गणिके, हीं अशीं खलबतं करीत बसायला मला वेळ नाहीं. तुझ्या मनांतून खेळायचं आहे कीं नाहीं ?

दयाळ०—असं कसं म्हणतां रावसाहेब ? नायकिणीच्या घरीं आल्यावर अत्तरगुलाब, नाचगाणं, माझ्यासारख्याकडून वारा घेणं, त्याबद्दल पांच चार रुपये देणं—

जय०—चूप. मला या कोणत्याच गोष्टींची जरूरी नाहीं. गणिके, बोल. तुला मजबरोबर द्यूत खेळायचं आहे कीं माझे पैसे परत देऊन सर्व बंदिवानांची मुक्तता करायची आहे ?

दया०—(स्वगत) त्यांच्या मनांतून तुमचीच तुरुंगांत योजना करायची आहे.

तारा०—महाराज, आपण द्यूत खेळण्याविषयीं आग्रह करतां याचा पूर्ण विचार करा. विषाची परीक्षा पाहूं नका. हें मी आपल्याला भिऊन सांगतें, असं मात्र समजूं नये. आपण मला जिंकलंत तर ठीकच; पण आपल्या दुर्दैवानं मीं तुम्हांला जिंकलं तर—

जय०—तर काय ? इतरांप्रमाणें मीही तुझ्या कारागृहांत पडेन हेंच कीं नाहीं ! त्यांत काय ? तूं जर जाणून बुजून पण लावला आहेस, तर तूं माझी दासी होणं, किंवा मी तुझा गुलाम होणं, यांत तुला हर्षामर्ष वाटण्याचं कारणच नाहीं.

तारा—ठीक आहे. चलावं खेळण्याची तयारी आहे. (जातात.)

दया०—देव करो आणि हा धाटिंगण तुरुंगांत पडो; म्हणजे मला मध्यस्थी न दिल्याबद्दल याची चांगली कणीक मऊ करीन. परमेश्वरा, धांव लौकर.

गजरा—(प्रवेश करून) नशिब गं बाई त्या परमेश्वरांचं, कीं त्याचं पवित्र नांव आमच्या दयाळरावाच्या अपवित्र तोंडांतून येत आहे.

दया०—गप्प बैस. किती वात्रटपणा करशील?

गजरा—अगबाई, केवढ्यानं ओरडलांत ?

दया०—कोण तूं कां ? वाहवा ! अगदीं वेळेवर आलीस. एका मोठ्या महत्त्वाच्या कामांत मला तुझंच मत घ्यायचं होतं.

गजरा—महत्त्वाच्या कामांत ? आणि माझं मत ? असं कोणतं बाई काम तें ?

दया०—या राजपुत्राचं आणि बाईसाहेबांचं लग्न झालं, तर कसा काय जोडा दिसेल ?

गजरा—अगदीं रति-मदनासारखा शोभेल.

दया०—बरं. दयाळरावाचं आणि गजरेचं जमलं तर ।

गजरा—दयाळराव कोण ? तो नायकीणाच्या घरीं जोडे पुसतो तो का ? त्या ह्मसोबाला गजरेचा पायपोस विचारतोय.

दया०—अग रांडे ! (उघड) पण भांडीं वासगान्य गजरेला तो जोडे-उचल्या ह्मसोबा कांहीं वाईट नाहीं.

गजरा—हूँ. असा पांचटपणा मला नाहीं खपायचा.

दया—आतां कशी झोंबली ! अगदीं खरंच सांग, कदाचित् दयाळरावाचं गजरेशीं लग्न जुळलंच तर तें जोडपं कसं काय शोभेल ?

गजरा—शुद्ध धेडगुजरी दिसेल.

दया०—म्हणजे कायग ?

गजरा—अहो, गजरा तुमची बायको झाली, तर लोक तिला गाढवी ह्मणतील.

दयाळ०--म्हणजे? मी गाढव आहें वाटतं?

गजरा--हें सांगायला का पाहिजे? गाढवाचे कान इतकाच कायतो भेद. बाकी अक्कल अगदीं एक.

दया०--ती कशीग?

गजरा--अहो कांहीं अब्रूची नोकरी करायची सो घरीं कुत्र्याप्रमाणं तुकड्यावारी मध्यस्थी करीन चोवीस ना अडका, घर ना दार, शेत ना वाडा, अशा सडकर्स गुंतविण्यापेक्षां विहिरींत जीव दिलेला काय वाईट?

दयाळ०--तूं काय मला कफल्लकच समजतेस वा ही पाहिलीस का? सबंध पाचूची असून किमतीनं लाखांची. माझ्याशीं लग्न करायला तयार झालीस, त करतों, नि मग पहा, तुला कशी सोन्यामोत्यांच्या दागि

गजरा--अशी अंगठी बघूं तरी कसलीशी आहे उजेड! मी म्हटलं खरंच पाचूची आहे कीं काय? असल ड्क्या बाजारांत अडक्याला तीन मिळतात. द्या टाकून

दयाळ० – गधडी म्हणून हाक मारली तर ओ म्ह आहे का? अग ही अंगठी त्या राजपुत्रांची आहे. माझ्र नाहीं, म्हणुन मी ही डफरावून ठेवली आहे.

गजरा--मग त्यांत माझा हिस्सा असेलच. मी तु

दयाळ०--हं अशी ताळ्यावर ये. म्हणजे माझ आंगठ्या ओवाळून टाकीन.

गजरा--अगबाई, बाईसाब-- (इतक्यांत जयर

जय०--　　　　पद (शरमावो फरमावो,)

द्यूतीं अती निष्णात परी तूं फसालिस मज
उतरलाच तव नक्षा सारा समज खास

तारा—महाराज दैवें आज आपुल्या सांपडलें हातीं ।
ईशदयेनें पूर्ण जाहली इच्छा मनिची ती । भ्रम गेला ।
जय०—नच सगळा ॥
तारा—मुळिं नुरला ॥
जय०—उरला असे तरि दवडुनि सर्वहि घालवितों मस्ती ॥
तारा—द्यूतांत पूर्ण हरलें । स्वातंत्र्य तेंहि नुरलें । नच आतां बढाई ती ।
जय०—परि थांब शासन तुला पाहिजे तरिच राहि भीती ॥
तारा—दासि बनविली या पदिंची हें शासन का कमती । मला हें ॥

महाराज, न्याय्यदृष्टीनं माझ्या अपराधाला शिक्षा पाहिजे, हें तर योग्यच आहे. पण थोर व पोक्त मनुष्यांच्या विचारानंच मीं सर्व कांहीं केलं आहे.

जय०—वाहवा ! स्वतःच्या कल्याणाकरतां अनीतीचा मार्ग स्वीकारून, त्याचे झाडे देतांना, थोर लोकांना पुढं करून आपल्या पातकांत असत्य भाषणाची भर घालूं पाहतेस काय ?

पद. (काननुमे,)

हा दुष्टे मतिभ्रष्टे, हें पातक फेडिसि कोठें । ठेवुनि दीपक मार्जारशिरीं, द्यूत खेळसी कां कपटें । असंख्य तरुणां फसवुनि यापरी घालिसि बंदीं कां कुलटे । अपार लक्ष्मी तव गृहिं असतां कृत्य करिसि हें कां खोटें ॥

दयाळ—बाईसाहेब, यांनीं फारसं तोंड सोडलं आहे. उडवूं कां चार कोरडे ?
तारा—गप्प बैस मेल्या. आजची वेळ कांहीं तशी नाहीं.
गजरा—पण जित्याची खोड मेल्याखेरीज जायची नाहीं.
तारा—अरे, या महाराजांनीं मला द्यूतांत जिंकलं आहे.

गजरा—पण यांची लुब्रेपणाची खोड कुठं गेली आहे ! जा तिकडे देवडीवर बसा जा.

जय०—हे गणिके, बोल या एकंदर दुष्ट कृत्यांत तुझा हेतु काय ?

तारा—ऐकावं महाराज. यांत माझा कांहीं वाईट हेतु नसून—

जय०—अहाहा ! विषयवासनेनं अंध झालेल्या अनेक राजपुत्रांना कपटानं बंदींत टाकण्यांत तुझा असा काय सुंदर हेतु होता, तें कोणीही सांगेल.

तारा—सुंदर हेतु नसता, तर मीं आपणासारख्या रूपगुणसंपन्न पतीची धर्मपत्नी होण्याला कधींच पात्र झालें नसतें.

जय०—काय ? निष्कलंक राजकुलांत उत्पन्न झालेल्या मजसारख्या धर्मभीरु पुरुषांची तूं धर्मपत्नी होणार ?

पद (शशि कीं कमल,)

छे, छे, वदलिस कसें अनुचितसें । गणिके विनय तुज किमपि नसे । आचार विचार सोडोनि प्रकार । केलेसि बहुविध कुचाति तसे । अगणित कामिजनां रमविल वारांगना । धर्मांगना मानोनि नेउं कशि सदना । जगामधिं करुनि हंसें ॥

दयाळ०—अरेच्या, हा अधिकच बहकूं लागला, दाखवूं का याला दयाळरावाचा हिसका ?

तारा—महाराज, वेश्याजनांच्या व्यवहाराकडे पाहतां आपलं म्हणणं बरोबर आहे, परंतु माझ्या हातून तसं वर्तन कधींही घडलं नाहीं.

जय०—तें सर्व खरं, पण रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्या अधाशी श्वानांनीं चव्हाट्यावरच्या भाकरीचा लचका जरि तोडला नाहीं, तरी ते त्याला हुंगून तरी जाणारच; तद्वत् पानपट्टी, अत्तरगुलाब वगैरे देतांना, हजारों विषयी लोकांना तुझा हस्तस्पर्श तरी झालाच असेल.

दयाळ०—छे, छे, महाराज. पानपट्या, अत्तरगुलाब वगैरे देण्याचं काम अस्मादिकांकडे होतं

जय०—तें कोणाकडे कां असेना. मला काय करायचं ? हं. गणिके, ठरल्याप्रमाणं सर्व बंदिवानांची मुक्तता करतेस, कीं पुढचा विचार करूं ?

तारा—पण माझं पाणिग्रहण करण्यासंबंधानं काय विचार ठरला ?

जय०—वेश्या कितीही पवित्र असली, तरी राजपुत्रानं तिचं पाणिग्रहण करूं नये हाच.

दयाळ०—महाराज, आमच्या बाईसाहेब कांहीं इतर नायकिणींसारख्या हलक्या नाहींत. आपण जसे राजपुत्र अहांत, तशा त्याही राजकन्याच आहेत.

जय०—होय का ? तर मग तुम्हीही पण एकाद्या देशचे राजे असाल ?

दयाळ०—हो तर. मी दलालपुरचा राजा आहें. आणि ही पहा माझी भावी राणी.

गजरा—बरं हो राजेसाहेब. (वेडावते.)

तारा—महाराज, आपण कांहीं ही थट्टा समजूं नये. माझा जन्म जरी वेश्येच्या पोटीं झाला आहे, तरी मी या अलकावतीनगरच्या तारापीड महाराजांची कन्या आहें. महाराजांनीं आपल्या औरस कन्येप्रमाणं मला वागवून शिक्षणही दिलं आणि—

जय०—त्या शिक्षणाचा या कपटक्रियेंत चांगला सदुपयोग झाला असंच ना ?

तारा—छे. छे. हा पण मीं आपल्या बुद्धीनं लावला नाहीं. याला महाराजांचंही अनुमोदन आहे.

जय०—बरं त्याचं कारण ?

तारा—महाराजांनीं आपल्या कन्येचा विवाह केला, तसा माझाही कोणातरी राजपुत्राशीं विवाह करावा, अशी मीं विनंति केली; परंतु माझ्याशीं कोणी राजपुत्र स्वसंतोषानं विवाह करणार नाहीं, म्हणून ही पणाची युक्ति केली.

जय०—असंका ? तर मग बंदींत टाकलेल्या राजपुत्रांपैकीं एखाद्याला कां पसंत केला नाहींस ?

तारा—एकाच्याही अंगीं सद्गुणाचा लेश सुद्धां दिसला नाहीं म्हणून.

जय०—मग माझ्याच अंगीं तूं काय गुण पाहिलास ?

तारा—माझी कपटक्रिया ओळखून मला द्यूतांत जिंकलं हाच.

जय०—पण यापूर्वी तुला एखाद्यानं द्यूतांत जिंकूनही सत्तेच्या जोरावर तूं त्याला बंदींत टाकलं नसशील कशावरून ?

दयाळ०—छत्. इतका शहाणा आपल्याला तर कोणी दिसलाच नाहीं. कोणी ताईसाहेबांचं रुप पाहून दिपून जाई, तर कोणी आ पसरून उभा राही; कोणी दांत इचकून हंसे, तर कोणी भोंकाडच वासून बसे; कोणी माकडचेष्टा करी तर कोणी त्यांचे घट्ट पाय धरी. पण आपला प्रकार कांहीं निराळाच. आपण तर——

जय०—अहो स्तुतिपाठक ? पुरे करा. मी आत्मस्तुतीला भुलणारा मनुष्य नव्हें.

दयाळ०—मग मीही खोटं बोलणारा मनुष्य नव्हें. जें खरं होतं तें बोललों.

जय०—तर मग तुमचा खरेपणा कांहीं कालपर्यंत तुमच्यापाशींच ठेवा.

दयाळ०—अरेच्या ! हा बेटा कांहीं माझी मात्रा चालूं देत नाहीं.

जय०—गणिके, तुझी हकिगत समजली इतकी बस्स आहे. आतां पुढें काय तें बोल.

तारा—आपण मला पदरांत घेण्याचं वचन दिलंत, कीं माझं बोलणंच संपलं.

जय०—तें नांव काढूं नकोस. राजपुत्रानं वेश्येचं पाणिग्रहण केलं, असें तूं कधीं तरी ऐकलं आहेस का ?

तारा—कां बरं ? आजपर्यंत कित्येक राजपुत्रांनीं यापेक्षांही नीच जातींच्या कुमारिका वरिल्याचं आपल्या नाहीं कां कधीं ऐकिवांत ?

जय०—विषयसुखाच्या लालसेनं किंवा अन्य कांहीं कारणानं त्यांनीं तसं केलं असेल, पण मला तसं कांहीं कारण नसतां, कुलशीलाला कलंक लागेल असं कृत्य मीं कां करूं ?

दयाळ०—(स्वगत) नका करूं. मग इथून काळं तरी करा एकदां.

तारा—महाराज, मी शुद्धांतःकरणानं आपली सर्व हकिगत कळविली असून आपण माझा धिक्कारच करतां, असो मर्जी आपली. ठरल्याप्रमाणं माझ्या धनदौलतीचे व या अभागी देहाचे स्वामी आपण झालांच अहांत; तेव्हां कृपाळू-पणानं त्या संपत्तीचा अंगिकार केलात, तर ती सत्पात्रीं पडेल; नाहीं पेक्षां ती काय चंचलच आहे, कोणाचीही बटीक होऊन राहील; परंतु माझी मात्र गोष्ट तशी नाहीं.

जय०—कां बरं! तुम्ही वेश्या तर लक्ष्मीपेक्षांही चंचल आहांत.

तारा—कोण असतील त्या असोत बिचाऱ्या. मला जर त्यांचं अनुकरण करायाचं असतं, तर आजपर्यंत अनेक तरुण व सधन लोकांशीं कपट करून त्यांचे विनाकारण शिव्याशाप मीं घेतले नसते. आईबापांची आज्ञा अमान्य करून आपला हट्ट तडीस नेण्याकरितां सर्व मनोविकार मनांतल्या मनांत दडपून ठेवले नसते. प्रारब्धावर हवाला ठेवून आपल्यासारख्या सर्वगुणसंपन्न पतीची चातकाप्रमाणं मार्गप्रतीक्षा करीत बसलें नसतें. खरोखर महाराज, आपण मला जिंकलंत एव-ढ्यानं मी कृतार्थ झालें. आतां हा देह आपला आहे. याची कींव करून याला आपल्या सेवेला लावा, प्रेमपाशांनीं बद्ध करा व कृपेच्या उदकानं पावन करा.

जय०—गणिके, जें ठरलं तें ठरलं. उगीच आग्रह करूं नकोस.

तारा—तर मग माझ्या आशेचा भंग झाल्यामुळं जन्मभर दुःखांत काळ घाल-विण्यापेक्षां हें शस्त्र घेऊन स्वहस्तानं या देहाचा अंत करा. तरीही मी आनंदच मानीन.

जय०—इच्या एकंदर हकीगतीवरून व लीनतेच्या वर्तनावरून, इच्यांत कांहीं कपट दिसत नाहीं, तरी पण कसोटीचा आणखी एक वेढा उगाळून पहावा. (उघड) गणिके, तुझ्या देहावर माझी सत्ता झाली आहे ही गोष्ट खरी, परंतु तुझ्या प्राणावर माझा कांहीं अधिकार नाहीं. तेव्हां त्याची कायती तूंच स्वतः वाट लाव, म्हणजे मग मी तुझ्या देहाचं काय करायचं याचा विचार करीन.

तारा—तर मग हा प्राण या चरणींच अर्पण करतें.

जय०—हां, थांब. माझ्या हुकमावांचून तुझ्या अवयवांनीं कोणत्याही प्रकारची हालचाल करतां कामा नये. कारण, देह माझा आहे.

तारा—महाराज, आतां माझी मती कुंठित झाली आहे. या दीन दासीची आपणच कायती व्यवस्था करावी.

जय०—ठीक आहे. तर मग आतां असं कर.

तारा—(मोठ्या आशेनं) कसं करूं महाराज ?

जय०— पद (आतां शशिमुखिच्या,)

ये, ये, कमलमुखी झडकरी मज तूं भेट दे। वृत्त कथिसी तें परिसुनि सारें। द्रवलें मन्मन सखये। पाहुनि निष्ठा मजवरीची ही। मोद मनीं न समाये॥

(जयसेन व तारा भेटतात, तें पाहून दयाळराव गजरेस मिठी मारतो.)

गजरा—अगबाई! डोकं फिरलं कीं काय? महाराजांची तरी कांहीं लाज धरा. तोंडांत शेण घालतील ना!

दयाळ०—काय म्हणून? जसं तें करतात, तसं मी करतों. तें बाईसाहेबांना भेटल्याबरोबर मी तुला लगटलों यांत काय गैर झालं?

तारा—हा मेल्यांनों हें रे काय? तुम्हांला असं कळवंडायला काय झालें ?

दयाळ०—आपणा उभयतांना आनंदांत पाहून मलाही अत्यानंद झाला आणि तो प्रदर्शित कर, म्हणून मी इला सांगूं लागलो. पण ही पडली अडाणी. कांहीं केल्या ऐकत नाहीं.

गजरा—बाईसाहेब, यांचा भलताच चावटपणा मला कांहीं आवडत नाहीं.

तारा—दयाळराव, या गजरेवर तुझं प्रेम जडलं आहे वाटतं ?

दयाळ०—होय. पण तिचं आमचं जमेल तेव्हां खरं.

तारा—आणि गजरे तुझंग ? (गजरा लाजते.)

दयाळ०—तिनं लाजून मुरका मारलान यावरून नाहीं का लक्षांत आलं?

तारा—बरं गजरे, आजपासून तुला मी दासीपणांतून मुक्त करून या दया-

ळरावाला अर्पण केली आहे. जा आतां. आजपासून त्याच्या घरीं राहून सुखानं संसार कर. बरं का ? (दयाळराव व गजरा जातात.)

जय०—प्रिये चल. आतां आधीं त्या बंदिवानांची मुक्तता करूं. म्हणजे मला आपल्या कामाकरतां येथून जायला बरं पडेल.

तारा—महाराज, बंदिवानांच्या मुक्ततेशीं नी आपल्या जाण्याशीं काय संबंध?

जय०—आधीं त्यांची मुक्तता कर. म्हणजे तुला सर्व सांगतों.

प्रवेश ३ रा.

स्थळ—रस्ता. (चौघे राजपुत्र व दयाळराव.)

१ रा०—देवा! कायरे हे सुखसोहाळे! सोन्या मोत्यांचे अलंकार गेले आणि हे लोखंडाचे नशिबीं आले.

२ रा०—भरजरीचे पोषाख अंतरले, आणि हे खादीचे कपडे अंगावर चढले.

३ रा०—मखमली जोड्याशिवाय आमचं पाऊल उचलायचं नाहीं; पण पायाच्या चिंधड्या उडाल्या तरी फाटका सुद्धां जोडा मिळत नाहीं.

४ रा०—घरीं पंचपक्वान्नं खातः होतों पोटभर, पण इथं वेळेवर मिळेना कांदा भाकर. देवा—

पद (बातामें धातोमें०)

हातांत पायांत जड शृंखला । पडोनि देहाचा झाला चुरा ॥ कोण तारील आम्हांस आतां । किती हें असे तरी दुःख अति-तर । भयानें काळीज कांपत थरथर । कामेंही खडतर कराया भरभर । बदे अधम नर पाणी भरतां दया न तिळभर । दगड फोडितां दळतां हातांची । चाळण करुनी, गाळण केली, कुलटेनें आमुची ॥

१ रा०—बरं कायरे, तूं हल्लीं काय काम करतोस ?

२ रा०—मल्या पहाटे उठतों, खराटा हातांत घेतों, आणि तुरुंगाभोंव तालचीं गटारं झाडून साफ करतों. आणि तूंरे काय करतोस ?

३ रा०—सकाळीं दहा पायल्या दळण दळतों, आणि दुपारीं वीस टोपल्या खडी फोडतों. आणखी तूंरे ?

४ रा०—माझी पहिल्या पहिल्यांदा चंगळ होती, आपलं दहा रांजण पाणी भरलं कीं मोकळा. पण परवांपासून बागेंतला बैल मेला ह्मणून मलाच जुंपतात मोटेला. पण तूं काय करतोस?

१ रा०—मी ? मी कांहीं करीत नाहीं, ह्मणून रोज शंभर फटके खातों, आणि खुशाल घोरत पडतों.

२ रा०— बरं आहे. इथून सुटून मला घरीं मात्र जाऊं द्या, कीं या रांडेला हाल हाल करून मारायला लावीन, तरच मी राजपुत्र होईन.

३ रा०—रावसाहेब, हा पोकळ आवेश आंवरून धरा आणि मोऱ्यागटारं साफ करण्याचं काम सुरू करा, नाहीं तर यमस्वरूपी दयाळराव–बापरे आलाच.

दयाळ०—(प्रवेश करून) चलारे झप झप. बाईसाहेबांनीं सर्व कैद्यांनां नाचडतोब तुरुंगाकडे बोलावलं आहे.

चौघे—तें कशाकरतां ?

दयाळ०—आज बाईसाहेबांना एका सुस्वरूप, तरुण राजपुत्रानें द्यूतांत जिंकलें त्याच्याशीं आतां त्यांचं लग्न होणार आहे. त्या आनंदप्रदर्शनार्थ आज सर्व कैद्यांना इच्छाभोजन द्यायचं आहे; तेव्हां बोला तुह्माला काय आवडतं तें ?

४ रा०—माती आवडते. पण आम्हांला इच्छाभोजन देणार कोण ?

दयाळ०—मी, मी देणार आहें.

१ रा०—तर मग नको. आजपर्यंत दिलंस, त्यानंच आमचं पोट तुडुंब भरलं आहे.

२ रा०—आतां इतकीच इच्छा आहे, कीं तुझ्या तडाक्यांतून जिवंत घरीं गेलों, म्हणजे सर्व भरून पावलों.

दयाळ०—हें पहा, असं वाईट वाटूं देऊं नका. खरोखरच तुम्हांला काय आवडतं तें सांगा.

३ रा०—आम्हांला लाडू आवडतात.

दयाळ०—कसलेरे लाडू? दळ्या, बुंदी, बेसन कां मोतीचूर?

४ रा०—छे! छे! छे! ते दास दास म्हणतात–मथुरादास नाहींरे!

१ रा०—अरे शहाण्या–ते पिवळे असतात, ते ना? ते रामदास.

२ रा०—अरे मूर्खा, रामदास भगवे असतात.

दयाळ०—अहारे गाढवांनो! राघवदास म्हणायचं ते मथुरादास, रामदास काय म्हणतां! बरं चला. त्यांच्या बदली तुम्हांला धम्मक लाडूच देतों.

चौघे—अरे बापरे! ही आमच्या मागची साडेसाती कधीं सुटणार?

पद (धन्य धन्य शिवाजी,)

मोठी खोटी ही गणिका। हरुनी नेलारे पैका। मारायाला लाथी हाका। गप गप गप॥ आलों कोण्या या प्रांतीं। पडली कैशी तरि भ्रांती। चाबुक बसती पाठीवरतीं। खप खप खप॥ उंची वस्त्रें घेवोनी। अडीच वस्त्रें देवोनी। कामासाठीं नेलि ओढुनी। झप झप झप॥ गेलें काळिज करपोनी। ऐशी ही स्थिति निरखोनी। अश्रु येती नेत्रांतूनी। टप टप टप। आधीं केलें बहु गर्वा। बापाची सोडिली पर्वा। बुद्धिभ्रंश झाला सर्वा। हाय हाय हाय॥ (सर्व जातात.)

प्रवेश ४ था.

स्थल—कैदखाना.

पात्रें—(सर्व कैदी, जयसेन, तारा, दयाळराव, शिपाई इ०.)

तारा—सर्व राजपुत्र, शेटसावकार व इतर सर्व धनिक गृहस्थहो! कुणा-

तरी सर्वगुणसंपन्न राजपुत्राची धर्मपत्नी व्हावं या इच्छेनं आजपर्यंत आपणा सर्वांशीं कपटानं वागून आपल्या दुःखाला सर्वांशीं मी कारण झालें; त्याचं मला फार वाईट वाटतं. असो. आज सुदैवानं तो माझा हेतु सिद्धीस गेला आहे. त्याचा मला जसा आनंद झाला आहे, तसाच तुम्हांला व्हावा, म्हणून तुमच्या मी जिंकलेल्या सर्व वस्तु परत देऊन आज तुमची मुक्तता केली आहे.

सर्व कैदी—अरे वाहवारे वाहवा! हे आदिमाये जगदंबे, या तुझ्या उपकाराबद्दल आम्ही तुझ्यापुढं शंभर वेळां नाक घासतों. (सर्व पायां पडतात.)

तारा—छे, छे, तुमच्या मुक्ततेचं सर्व श्रेय या सदय अंतःकरणाच्या महाराजांकडे आहे. म्हणून त्यांचे आभार मानून आनंदानं आपआपल्या नगरीं जा.

सर्व कैदी—हे नृपश्रेष्ठा. आम्हीं पामरांनीं तुझी थोरवी काय वर्णन करावी! आमच्या अंगाच्या कातड्याचा जोडा करून जरी तुझ्या पायांत घातला, तरी तुझ्या उपकारांची फेड होणार नाहीं. धन्य आहे तुझी.

पद (ऐ दावरे समद,)

हे पुरुषपुंगवा सदय होउनी । करुनि मुक्त विमल कीर्ति मिळविली जनीं ॥ प्राणदान तूं आम्हांस देउनी । आभारबंधनांत घेसि घट्ट बांधुनी ॥ निपजुनि तूं सत्कुलांत धन्य धन्य धन्य । पुण्यवान तुजसमान भूतलीं न अन्य ॥

जय०—बाबांनो, माझे आभार मानण्यापेक्षां ज्या सर्व शक्तिमान परमेश्वरानं तुमची मुक्तता करण्याचं सामर्थ्य माझ्या अंगीं दिलं, त्याचे आभार माना. भक्तियुक्त अंतःकरणानं त्याला आळवा, क्षणिक विषयांकडे चित्त न देतां सन्मार्गानं व सद्धर्मानं वागा, म्हणजे तुम्हांवर असा अनिष्टकारक प्रसंग कधीं येणार नाहीं.

१ रा०—ठीक आहे बाबा. आजपासून मी कधींही नायकिणीच्या घरीं जाणार नाहीं. हा पहा कान पिळून घेतों.

13912

२ रा०—मी गालगुच्चे घेतों.

३ रा०—मी थोबाड फोडून घेतों.

४ रा०—मी पांच उठाबशा काढतों.

जय०—प्रिये, यांची सर्व चीजवस्त परत देऊन यांना आनंदानं निरोप दे.

तारा—दयाळराव, मीं सांगितल्याप्रमाणं या सर्वांची सर्व व्यवस्था कर.

(जयसेन व तारा जातात.)

दयाळ०—चलारे., सर्वजण असे ओळीनं उभे रहा. आणि तुमची सुटका केल्याबद्दल सांगा मला काय बक्षिस द्याल तें ?

१ रा—आमची सुटका झालीच आहे. त्यांत आतां आपण अधिक काय ध्वज लावणार आहांत ?

दयाळ०—होयका ? तर मग जा पाहूं ?

२ रा०—आमचे कपडे द्याल कीं नाहीं अगोदर ? का आम्ही असेच उघडीच वस्त्रांनिशीं साऱ्या गांवभर फिरायचं !

३ रा०—शिवाय हे आपले अलंकार परत द्याल कीं नाहीं ? कीं आम्ही असेच सांखळी तुटलेल्या कुत्र्यासारखं भटकायचं ?

दयाळ०—ह्मणूनच म्हणतों, कीं ही तुमची कामगिरी बजावल्याबद्दल तुम्ही मला काय बक्षिस देणार ?

४ रा०—आतां आमच्याजवळ उरलं आहे काय ? होतं नव्हतं तेवढं तुझ्या धनिणीच्या उरावर घातलंना ?

१ रा०—बाबारे, त्रागा करण्याची ही वेळ नाहीं. धन्याची मर्जी प्रसन्न व्हावी, म्हणून जसा त्याच्या कुत्र्यापुढं तुकडा टाकायचा, तसं याच्या तोंडावर कांहीं तरी टाकून आपली सुटका करून घ्या कशी ?

२ रा०—बरं तर. ही घ्याहो तुम्हांला माझी टोपी बक्षिस.

३ रा०—हा घ्या माझा सदरा.

४ रा०—ही घ्या माझी विजार.

१ रा०—हे घ्या माझे कडीं तोडे. खुशाल घाला आणि आनंद करा.

दया०—असं काय? ठीक आहे. या तर मग. जसं मला तुम्हीं दिलंत तसं मीही तुम्हांला बक्षिस देतों.

२ रा०—नको. आजपर्यंत दिलंस त्यांतच आम्हांला आनंद आहे. हें पहा आमच्या पाठीवर अजून शिल्लक आहे.

दया०—तर मग आतां मानेवर देतों.

३ रा०—मानेवर देतों? असं मानेवरचं बक्षिस काय असेल बोवा?

दया०—'तारेचे गुलाम' अशा अक्षरांचा एकएक शिक्का.

४ रा०—अरे देवारे! आतां आमच्या मानेवर शिक्कामोर्तब का होणार? कोणत्या खडतर मुहूर्तावर घरांतून बाहेर पडलों होतों, कीं तेव्हांपासून हा दयाळरावरूपी राहू आमच्या बोकांडीं बसला आहे!

१ रा०—बरं दयाळराव, हा शिक्के मारायचा विधि आटोपल्यावर आणखी कांहीं आमचे सोहाळे राहिले आहेत, कीं संपले?

२ रा०—राहिलेच असतील तर बाबा काय तुझी हौस असेल ती एकदां पुरी करून घे, आणि सोडीव या जाचांतून.

३ रा०—हो. म्हणजे आम्हीं घरीं गेल्यावर तुझ्या या दयाळुपणाबद्दल तुला एक सोन्याच्या नळकंड्यांतून मानपत्र पाठवून देऊं.

दया०—तूर्त मी तुम्हांला सुवर्णपदकें देतों तीं घ्या, मग तुमचं मानपत्र पाहूं; चला एकेक पुढं, आणि घ्या मानेवर एकेक शिक्का.

४ रा०—पण त्या शिक्क्याचा मासला आपल्याच मानेवर मारून दाखीव पाहूं!

१ रा०—हो. म्हणजे ती शोभा पाहून आम्हींही पुढं होऊं.

२ रा०—आणि आम्हांला पसंत पडल्यास आम्ही मारून घेऊं.

३ रा०—पण इतकीं आर्जवं कशाला? चला आपले मुकाट्यानं घरीं जाऊं.

दया०—चाललांत कुठें? (प्रत्येकाच्या मानेवर शिक्के मारतो, ते विह्वल होऊन पडतात.)

प्रवेश ५ वा.

तारेचा महाल (तारा व जयसेन.)

जय०—हें काय बरं, जा आतां महालांत. आतां मला निरोप द्यायला हरकत नाहींना ?

तारा०—हरकत नाहीं. पण या दासीला दिलेल्या वचनाची आठवण राहील ना ? सरंच लौकरच परत यायचंना ?

जय०—वाः हें काय विचारतेस ?

पद (जानहमारी,)

प्राण हा माझा येथें गुंतलाच पाहीं ॥ त्यजोनि मी तुज पर-देशीं, राहूं केविं वद हेंच मजसी ॥ सूज्ञ तूं असुनि वदणें हें योग्य नाहीं । विचार हे मनिं भलभलते । आणुनि श्रमविसी निज तनुतें । धीर धरुनियां सखये तूं स्वस्थ राहीं ॥

तारा— पद (दिलजानीमिली,)

गमेल मातें कसें प्रियाविण बाई । विरह हा मला कीं भारी अनावर होई । पडेल मूर्ती पुन्हां कधीं दृष्टिला ही । यामुळें मनाची स्थिती भयंकर होई । अहा वेड्या मना, तुझी ती वासना, पूर्ण झालीहिना, आतां ही कल्पना, दूर राही ॥

अंक ३ रा.

प्रवेश १ ला.

स्थळ--जंगल (जयसेन, पुष्पावती, हम्माली, राक्षस इ०)

जय०-- **पद** (नशिब फिरलें,)

निबिड विपिनीं । न दिसे मज मानवप्राणी । हे सर्प भयंकर फिरती । अतिक्रूर पशू ओरडती । व्याघ्र सिंहांनीं । वन गेलें बहु गजबजुनी ॥ चाल ॥ असुनि भयद ऐशी मत्स्थिती या स्थलीं रे । पुढिल सुपथ कोणा मी पुसूं ना मुरारे । कठिण समयिं माझा अंत पाहूं नकोरे ॥ विकट कुपथ रानीं कंठितां त्रासलोंरे । हो साह्य मला यासाठीं । या ठायीं अतां जगजेठी, पुढें होवोनी । मज विजयी करिं या भुवनीं ॥

(इतक्यांत पुष्पावती फुलें वेंचीत प्रवेश करिते.)

अरे! अशा निबड अरण्यांत निर्भयपणानें एकटी संचार करणारी ही सुंदरी कोण असावी बरं ?

पुष्पा०--अगबाई! हे कोण? आई धांवग धांव!

जय०--हं. हं. भिऊं नकोस. मी कोणी भूतपिशाच्च नसून कालचक्राच्या सपाट्यांत सांपडलेला एक निराश्रित मानवप्राणी आहें.

पुष्पा०--मानवप्राणी आहें ? अगबाई! मग आपला या यक्षांच्या राज्यांत प्रवेश कसा झाला?

जय०--मी इथं कसा आलों हें माझं मलाच समजत नाहीं.

पुष्पा०---म्हणजे ! झोपेंत किंवा गैरशुद्धींत असतांना आपल्याला इथं कुणी आणलं कीं काय ? असं असेल तर आपण होईल तितक्या त्वरेनं इथून निघून जा नाहींतर व्यर्थ प्राणास मुकाल.

जय०---या तुझ्या संदिग्ध भाषणाचा मला कांहींच अर्थ समजत नाहीं-

(पडद्यांत ' प्राणप्रिया हिडिंबासुरा, बाळे पुष्पावती ' असा ध्वनी होतो.)

पुष्पा०---ही पहा माझी आई माझा शोध करीत इकडेच येत आहे.

जय०---ह्मणजे ? तुझी आई कोणी राक्षसीण आहे कीं काय ?

पुष्पा०---होय. ह्मणूनच म्हणतें कीं आपण जर तिच्या दृष्टीस पडाल, तर ती आपल्याला एका क्षणांत भक्षण करील.

जय०---मग आतां कसं करूं म्हणतेस ?

पुष्पा०---ती इथून निघून जाईपर्यंत आपण त्या वेलीच्या जाळ्यांत लपून बसा.

जय०---ठीक आहे. तसंच करतों. (जयसेन जातो.)

पुष्पा०---देवा ! याला या संकटांतून वांचवून जर याचा माझा निरंतर सहवास घडवून देशील, तर आजपर्यंत या ठिकाणीं भोगलेलं दुःख, त्रास, हाल, वनवास क्षणांत विसरून मी तुझे उपकार जन्मोजन्मीं विसरणार नाहीं.

हम्मा०---(प्रवेश करून) बाळे पुष्पावती.

पुष्पा०---काय ह्मणतेस ग आई ?

हम्मा०---तूं आतां आभाळाकडे हात करून प्रार्थना कुणाची करीत होतीस ?

पुष्पा०---दुसऱ्या कुणाची करणार ? परमेश्वराची.

हम्मा०---परमेश्वराजवळ काय मागत होतीस ?

पुष्पा०---माझा प्रतिपाल करणाऱ्या माझ्या आईला उदंड आयुष्य दे, इतकंच मागत होतें.

हम्मा०---वाहवा ! माझ्या ठिकाणीं तुझी ही निस्सीम भक्ति पाहून मला फार आनंद होतो. त्याबद्दल थोड्याच दिवसांनीं मी तुझं कांहीं प्रिय करीन बरं ?

पुष्पा०—म्हणजे काय करशीलग आई ?

हम्मा—माझी प्रियभगिनी जी शूर्पकर्णा तिचा मुलगा जो भग्नदं त्याच्याशीं तुझा विवाह करून देईन.

पुष्पा०—मी नाहीं जा. मी अशानं जीव देईन.

(पडद्यांत ' प्राणप्रिये हम्माले ये, ये, ये, ' असा शब्द होतो.)

हम्मा०—प्राणप्रिय हिडिंबासुरा ये, ये, ये. हा पहा तुझा प्रिय पिता इकडेच येत आहे. त्याच्यादेखत अशी रडूं नकोस. त्याचा विनाकारण कोप होईल.

राक्षस—(प्रवेश करून) प्राणप्रिये हम्माले !

हम्मा—प्राणेश्वरा हिडिंबासुरा !

राक्षस—ये ये सुंदरि मत्प्राणेश्वरि राक्षसराजकुमारी ॥
मद्भुवनमंदिरि मदनमंजरी वास करी सुकुमारी ॥
भार्ये आलिंगन दे, आर्ये आलिंगन दे ॥

हम्मा०—शूराहुनि तूं शूर खरा त्या माराहुनि सुकुमार ॥
धीर वीर गंभीर पुरा मत्प्राणाचा आधार ॥
नाथा आलिंगन दे, कांता आलिंगन दे ॥

राक्षस—प्राणप्रिये, तुझ्या आलिंगनसुखाचा महिमा जितका वर्णन करावा तितका थोडाच होणार आहे. आपला हा शृंगार गलितधैर्य व हतवीर्य अशा प्रत्यक्ष शिखंडीच्या जरी नजरेस पडेल तरी तो सुद्धां लागलीच धाड धाड, फाड फाड करूं लागेल. अहाहा ! काय हा तुझा सुकुमार देह—

इंदु वदन, तव कुंद रदन, अरविंद नयन, हे छान ॥
मंद गमन, मन धुंद करुन, तव छंद नुरवि सुळि भान ॥
भार्ये आलिंगन दे, आर्ये आलिंगन दे ॥

हम्मा०—इश्श ! अहो प्राणेश्वरा, इश्श ! अहो या पुष्पावतीदेखत असे काय करतां ?

राक्षस—प्राणप्रिये ! या पुष्पावतीचं मुखकमल असं आज म्लान कां दिसतं?

हम्मा०—ती दिवसेंदिवस उपवर होत चालली आहे, त्यामुळं तिला पति-समागमाची इच्छा होत आहे.

राक्षस—तर मग तिचा व आपल्या लाडक्या भद्रदंताचा लवकर विवाह कर.

हम्मा०—ठीक आहे. बाळे पाहिलंसना ? आम्हां उभयतांचा जीव तुझ्या सुखाकरितां कसा तिळ तिळ तुटतो तो ?

पुष्पा०—(स्वगत) नुसता तिळतिळ तुटण्यापेक्षां एकदां त्याचा अंत होईल तर फार बरं.

राक्षस—प्राणप्रिये ! हम्माले ! !

हम्मा०—प्राणप्रिया ! हिडिंबासुरा ! !

राक्षस—आज चंपावती राणीसरकारचा असा हुकूम आहे, कीं त्यांच्या रनणबागेच्या बाहेरील दरवाज्यावर मी आणि कुसुमचंपा फुलावर तूं व त्यांच्या इतर दासी यांनीं पहारा करावा.

हम्मा०—स्वामिणीची आज्ञा मला मान्य आहे. आतां प्राणेश्वराची आज्ञा काय आहे ?

राक्षस—रात्रीं पहारा करतांना आत्म्याला आराम रहावा, एवढ्याकारे उत्तम मद्य तयार कर; तोंपर्यंत मी वनामध्यें जाऊन कांहीं भक्ष्य मिळाल्यास घेऊन येतों. (जातो.)

हम्मा०—ठीक आहे. बाळे पुष्पावती, नेहमींप्रमाणं मद्य तयार कर. जा लौकर.

पुष्पा०—तूं पुढं चल. थोडींशीं फुलं घेऊन मी पाठोपाठ येतें.

(हम्माली जाते. जयसेन पुढें येतो.)

जय०—सुंदरी, आतांच्या एकंदर भाषणावरून तुझी करुणास्पद स्थिति माझ्या बरीच लक्षांत आली; तेव्हां आतां सांग बरं. तूं कोण ? कुणाची व इथं कशी आलीस ?

पुष्पा०—महाराज, माझी विनंति मान्य करण्याचं मला वचन द्या, म्हणजे मी आपली सर्व हकीगत सांगतें.

जय०—आपले कांहीं तरी इच्छित हेतु सफल होण्याकरतां तूं जसं मज-जवळ वचन मागतेस, तसंच मलाही तुझ्याकडून वचन पाहिजे.

पुष्पा०—आपल्या कोणत्याही कृत्याकरतां माझा प्राण खर्ची पडला तरी हरकत नाहीं, हें घ्या माझं वचन.

जय०—त्याप्रमाणंच हें माझं वचन—सांग आतां आपली सर्व हकीगत.

पुष्पा०—अशा प्रसंगीं सविस्तर हकीगत सांगण्यापेक्षां फक्त—कनकपुरीच्या राजाची मी कन्या, असुरी मायेनं या राक्षसांनीं मला इथं आणून ठेविली आहे; इतकंच सांगितलं तरी पुरे.

जय०—पण तूं राजकन्या आहेस हें खरं कशावरून ?

पुष्पा०—या वेळीं अशा ठिकाणीं जास्त पुरावा काय देऊं ? पण मी खोटं बोलत असेन तर तो भगवान् सूर्यनारायण या क्षणीं मला जाळून भस्म करो.

जय०—हं, रडूं नकोस. मी तुला वचन दिल्याप्रमाणं तुझं काय प्रिय करूं ?

पुष्पा०—माझी सुटका करण्याचा जर आपला निश्चय आहे, तर माझा अंगीकार करून आपलं वचन पूर्ण करा. म्हणजे झालं.

जय०—इतकंचना ? ठीक आहे. आजपासून तूं माझी धर्मपत्नी झालीस.

पुष्पा०—यांत कधीं अंतर होणार नाहींना ?

जय०—छे, छे, शंका असेल तर त्या सर्वसाक्षी सूर्यनारायणासमोर मी तुला वचन देतों. असो. आतां माझी हकीकत ऐक. मी चंडधारा नगरीच्या अनिपिड राजाचा पुत्र. माझं मुखावलोकन करतांच माझ्या पित्याला अंधत्व आलं; तें अपेश टाळण्याकरतां मी इतके श्रम घेऊन येथपर्यंत आलों आहें.

पुष्पा०—अस्सं. अस्सं. आलं ध्यानांत. आपण त्या अमोलिक फुलासाठीं हें धाडस केलें आहे वाटतं ?

जय०--तूं अगदीं बरोबर ओळखलंस.

पुष्पा०--पण हें बिकट कार्य शेवटाला कसं जाणार ?

जय०--मग तूं आपलं वचन कसं पूर्ण करणार ?

पुष्पा०--आपण एवढ्याकरितां मला वचनबद्ध केलं वाटतं ?

जय०--उघडच आहे. मी कांहीं नुसत्या बायका मिळविण्याकरितां इथं आलों नाहीं.

पुष्पा०--यावर माणसानं काय बोलावं बाई ! बरं तें असो. पण आतां मी कसं करूं तें आपणच सांगावं.

जय०--काय पाहिजे तें कर, पण तें कुसुमचंपा पुष्प मला मिळवून दे.

पुष्पा०--(विचार करून) हं. आलं ध्यानांत. आज असं मद्य तयार करतें, कीं-ही हम्माली आणि तिचे ते प्राणेश्वर यांना भूल पडून तीं बेशुद्ध पडावींत; नंतर आपण ईश्वरावर भरंवसा ठेऊन त्या बागेंत जावं, आणि खुशाल फूल तोडून आणावं, पुढें काय होईल तें मी सर्व पाहून घेईन.

जय०--चल तर. आतां त्याच कामाला लागूं.

पुष्पा०--पण फूल हस्तगत झाल्यावर या दासीला दिलेल्या वचनाची आठवण राहीलना ?

जय०--पण तुला वारंवार ही शंका कां येते ?

पुष्पा०--हो, नाहींतर 'गरज सरो आणि वैद्य मरो; असं व्हायचं !

जय०--मी वचनभ्रष्ट कधींही होणार नाहीं. चल. (जातात.)

प्रवेश २ रा.

स्थळ--चंपेचा रमणबाग (जयसेन, चंपा, तिच्या सख्या, इ०.)

जय--अनेक भयंकर प्रसंगांतून निभावून शेवटीं या ठिकाणीं माझा प्रवेश तर झालाच. अशा दुर्गम स्थळीं येऊन पोचलों हें केवढं बरं माझं भाग्य ! अहाहा !

तिन्ही लोकांतील उत्तम उत्तम फुलझाडं, मधुर फलांचे वृक्ष, सुंदर सुंदर लता या सर्वांची मोठ्या कुशलतेनं योजना केल्यामुळं—

पद (पंखा फुलनका,)

गमे रममाण, फार उद्यान। उद्यान सुरेंद्राचें। म्हणति जें नंदनवन साचें। तेंच जणुं येथें। येथें कुणि आणिलें। कीं नकळे नूतन बनविलें। स्वयें देवेंद्रं। देवेंद्र क्रीडाया। कधीं कधिं मोदें या ठाया। कोणती उपमा। उपमा जरि दिधली। तरी ती तुच्छ होय सगळी॥

अहाहा! हेंच तें अद्भुत पुष्प. आपल्या तेजानं उघड्या डोळ्यांनीं मला पुढंच जाऊं देत नाहीं. सदोदित पूर्ण विकसित व सतेज राहणाऱ्या पुष्पा—

पद (न बोलो तारा तारा,)

दुःखें मोठीं मोठीं। तीं भोगोनि पंथीं। अति होवोनि कष्टी। हे मत्प्राण कंठीं। घेवोनियां अंतीं॥ दुःखें०॥ आलों पुष्पासाठीं। पाहोनि तें चित्तीं। तोषा ये भरती। हे मत्प्राण कंठीं घेवोनियां अंतीं॥ दुःखें०॥ उपवनिं पसरे गंध हा। तेजहीं सुकुसुमाचें। दीपवी खास मम नेत्र हें पुष्प फार गमतीचें। सर्वांतर्यामी जो श्रीरंग भरला। त्याच्याच सुदयें सुदीन आला॥

(फूल तोडून घेऊन चंपेजवळ जातो.) अहाहा! हीच ती यक्षकन्या. आपल्या समवयस्क सख्यांनीं वेष्टित रत्नखचित पलंगावर निद्रिस्त असलेली ही सुंदरी, कमलाच्या फुलांतील कमलेप्रमाणं दिसत आहे. वाहवा! काय हें सौंदर्य? हें पाहून मदनालाही—असो. हे प्रिय मुद्रिके, मजवर चोरीचा आरोप न यावा म्हणून मी तुला या यक्षकन्येच्या स्वाधीन करीत आहें. (मुद्रिका बदलतो.) हे सौंदर्यलतिके यक्षकन्ये, तूं जागृत झाल्यावर तुझ्या परवानगीवांचून पुष्प नेल्याबद्दल

मजवर कोप करूं नकोस. महाराजांचे डोळे बरे होतांच तुझं पुष्प तुला परत आणून देईन; व केलेल्या अपराधाची क्षमा मागेन. अरे, पण ह्या पहा दिशा फांकत चालल्या. आतां पुढील मार्ग सुधारावा हें उत्तम.

(जयसेन जाऊं लागतो तोंच चंपेच्या सख्या जागृत होऊन चोर चोर म्हणून ओरडतात. जयसेन पळून जातो.)

सख्या—गडे, ऊठ ऊठ लौकर. तुझं आवडतं पुष्प चोरून तो पहा चोर पळून चालला आहे.

चंपा—(जागृत होऊन) हाय हाय! हें मी काय पहातें ?

पद (रामकरी जगि,)

हाय हाय मद्घात करोनी । पुष्प कुणीगे नेलें हरुनी । विकट स्थलिं या चोर कोठुनि । आलागे सखये ॥ असंख्य राक्षस रक्षक असुनी । कोण तयांतें मोह पाडुनी । कीं तन्नेत्रीं धूळ फेकुनी । गेला गे सखये ॥ आवडत्या कुसुमावांचोनी । सौख्य कोणतें जगिं वांचोनी । जिवत असुनी मेल्यासम मी वाटे मज सखये ॥

सखी—गडे असं धैर्य सोडूं नकोस. ही पहा हम्माली इथं घोरत पडली आहे; तिला विचार म्हणजे सर्व समजेल.

चंपा—ती काय आतां आपलं कपाळ सांगणार ? सखे, माझ्या आवडत्या पुष्पावांचून आतां मला सर्व उदास दिसूं लागलं, काय करूं ?

पद (चंदे महेतांब०)

नेलें कुसुम नोहे केलें हरण तयें । माझे प्राण । माझे प्राण । माझे प्राण ।माझे प्राण । हाय। हाय। हाय। हाय ॥ अतिशय खडतर । बिकट गिरीवर । मृतपुरिचा नर । कीं सुर-किन्नर। अथवा महिधर । बनुनी तस्कर । कृत्य भयंकर । करुनी

मजवर। दावा। धरुनी। घाला आणिला। प्रभुरे। ज्यानें। त्या अधमाला। शासन देई। तूंच दयाळा। आतां न दिसे। सुगती मजला ॥ हाय। हाय० ॥

(दुःखानें विह्वळ होऊन बसते.)

सखी—गडे, हें भयंकर साहस कुणीं केलं, याचा विचार न करतां तूं जर अशी दुःखीकष्टी होऊन बसलीस, तर कसं होणार ? चल, उठ. ज्या दुष्टानं हा घाला घातला, त्याचा शोध करून चांगली खोड मोडूं.

चंपा—अग वेडे, इतका कडेकोट बंदोबस्त असून ज्यानं पुष्प नेलं, तो चोर आतां कशाचा सांपडतो !

सखी—असं कां म्हणतेस ? तुझ्या पदरीं हजारों यक्ष व राक्षस आहेत, त्यांतून कांहीं चारी दिशांकडे पाठवून दे; म्हणजे ते त्या चोराचा तेव्हांच शोध करून आणतील.

चंपा—छे. छे. आतां हें काम दुसऱ्यावर सोंपवून देण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

सखी—म्हणजे ? त्याच्या शोधाला तूं स्वतःच का जाणार?

चंपा—जाणार म्हणजे ? तुला अजून शंका आहे कीं काय ?

सखी—हें पहा, असं साहस करूं नकोस. तूं किती जरी धारिष्टवान् असलीस, तरी स्त्री आहेस. रानावनांतून एकटी फिरतांना कोणीं पाहिलं तर कसं होईल बरं ?

चंपा—मी स्त्री असलें म्हणून काय झालें ? कशी झालें तरी यक्षकन्या आहेंना ? माझ्या शरीराला स्पर्श करण्याची मानवलोकांत कुणाची छाती आहे ?

सखी—मुद्रिका बदलतांना त्या राजपुत्रानं तुझ्या हाताला स्पर्श केला तें इतक्यांत विसरलीस वाटतं ?

चंपा—अग पण मी त्या वेळीं झोपेंत होतें ?

सखी—तर मग, तो नुसता हाताला च स्पर्श करून थांबला नसेल.

चंपा—असं आहे तर हा देह सर्वस्वी त्यांचा झाला. तेव्हां हा त्यांच्याच शोधार्थ मी खर्च करणार. मला आतां कुणी आड येऊं नका. चला सोडा मला.

(चंपा जाऊं लागते. सख्या आडवितात.

पद (जशी राजा करी प्रेम०)

सख्या—पहा बाई सुवच हें मनीं धरीं। नसे सखे तव कृति बरी ॥
चंपा—कशि असो न मी तत्‌क्षिती करीं । जाउंद्या ग लौकरी ॥
माझीया कुसुमासवेंच प्राणा । ज्यांनीं हरीले ग नेलें त्या
जाणा । शोधितें मी भूवरी ॥
सख्या—या तव कोमल तनुला पंथीं । परिपरिचे ते कष्टहि
होती॥ नच तुज कांधिं अशी। सवय मुळिच ती ॥
चंपा—तेंहि मी आनंदें साहिन । परि आतां मज तुम्हि ।
नकाग अडवुं कुणि ॥
सख्या—त्रास हो बहु अंतरीं ॥ (सव निघून जातात.)

प्रवेश ३ रा.

स्थळ—जंगल रस्ता.

(चौघे राजपुत्र, आंधळा, जयसेन इ०

१ रा०—कसं कायरे ? चलतां कां एखाद्या नायकिणीच्या घरीं ?
२ रा०—नकोरे बाबा—

त्या नीच दुष्ट गणिकेची । नलगे मुळिं संगत साची ।
ठेवुनी खूण जन्माची । मोडिली खोड कीं अमुची । कुलटेनें
मंजुळ बोलें । भुलवुनी पिसें भरवीलें । आम्हांस कफल्लक
केलें । त्यावरी यथास्थित मार । देउनी फार । जीव बेजार ।
करुनि स्वमनाची । पुरविली हौस ती साची ॥

१ रा०—अरे, मागचं दुःख आठवून रडत बसण्यापेक्षां प्राणावर आलेलं शेपटावरच गेलं, असं नशिब समजून पुढच्या मार्गाला तरी लागा.

२ रा०—नकोरे बाबा पुढचा मार्ग! आल्या वाटेनं मुकाट्यानं परत चला कसे. कारण तूर्त आपल्या राशीला आहे साडेसाती. गमतीखातर खेळलों तर इतक्या गोत्यांत पडलों, तेव्हां पुढं आणखी कोणत्या कचाट्यांत सांपडूं कुणाला ठाऊक?

३ रा०—पण आपण मोठ्या डौलानं फुलाच्या शोधाला निघालों आणि आतां जर हात हालवीत परत गेलों, तर लोक आपल्या तोंडावर थुंकतील याचा कांहीं विचार?

४ रा०—आपण त्यांच्या तोंडावर थुंकावं हाच.

१ रा०—अरे पण मूर्खांनो, महाराजांना काय सांगावं?

२ रा०—द्यावी एखादी सुरेखशी लोणकडी गप्प ठोकून म्हणजे झालं. आंधळ्या महाराजांना फसवायला कितीसा उशीर?

३ रा०—ती कशी काय लोणकढी ठोकायचीरे?

४ रा०—महाराजांना म्हणावं कीं, शोधाअंतीं असं समजतं, कीं तें फूल मृत्युलोकांत नसून स्वर्गलोकीं आहे.

१ रा०—बस, बस. हें छान. म्हणजे महाराजही कंटाळले आहेत, आणि फूलही स्वर्गलोकीं आहे. तेव्हां महाराजांनांच स्वर्गांत जयाला सांगावं, कीं सर्वच भानगड मिटली.

२ रा०—हो असंच. म्हणजे आपल्या मागची दगदगही चुकली.

३ रा०—वा! छान ही शक्कल मात्र छान निघाली.

४ रा०—पण ती अस्मादिकांनींच काढली. कसं आहे आमचं विस्तीर्ण डोकं? नाहीं तर तुमची मडकीं! अगदींच किडकीं!

लेलं
१ रा०—अरे अकलेच्या खंदका ! येवढ्यानंच हरभऱ्याच्या झाडावर चढलास का ? त्या दयाळरावानं मानेवर खंडोबाची मेख मारली आहे, ती आहेका लक्षांत !

२ रा०—होयरे होय. ' तारेचे गुलाम ' असे मानेवर शिक्के मारले आहेत, ते आपली चार चौघांत अब्रू घेतील खरे.

३ रा०—अरे वेडा आहेस तूं. भरगच्ची कपडे अंगांत असल्यावर त्याच्या तेजानंच ते लोपून जातील.

४ रा०—नाहींतर मला वाटतं ते दगडानं किंवा लाकडानं खरडून टाकावे.

१ रा०—इतकं करण्यापेक्षां मानेची तेवढी सालच काढून टाकली तर ?

२ रा०—मग काय तो एक विचार ठरवा. म्हणजे समोरच्या नदीवर जाऊन तेंच काम सुरू करूं.

३ रा०—पण मीं म्हणतों, इतकी यातायात करण्यापेक्षां लोकांना अशी गप्प ठोकावी, कीं मानेला शोभा येण्याची ही एक नवीन टूम देशोदेशीं फिरून अक्कल खर्चून आम्ही आणली आहे.

४ रा०—पण थांबा. यापेक्षां एक दुसरी युक्ति आहे. सर्वजण खालीं मान करून मला आपआपले डाग दाखवा पाहूं. (तिघे माना खालीं करून उभे, व एकजण तपासतो, इतक्यांत एक आंधळा चांचपडत येतो. त्याची काठी चुकून तिघांच्या पाठींत बसते.)

१ रा०—ओयोयो ! अरे गाढवा ! हीच का तुझी युक्ति ? (त्याला मारतात.)

२ रा०—अरे पण मी काय केलं ? मला उगीच मारतां कां ?

३ रा०—पाठीचीं डाडं मोडली ना मूर्खा ! ! आणि उलट मारतां कां म्हणून विचारतोस कां ?

४ रा० – हाडें मोडणार तो पाहिलात का तुमचा काका ! उगीच का माझ्या नावानं मारता हाका ?

राज०—(आंधळायस मारून) अरे चोरा भिका
आम्ही कोण आहोंत आम्हाला ओळखत नाहींस, लुच्चा,

आंधळा—(विव्हळत) अरे देवारे ! बाबांनो मला
पायां पडतों.

१ रा०—तर मग आणखी चार गुद्दे लगावतों. का
दांडकं मारलंस ?

आंधळा—मुद्दाम नाहीं मारलं महाराज, मीं आंधळ

२ रा०—आंधळा असलास म्हणून ? तुझे डोळे फुट

आंधळा—फुटले म्हणून तर ही दशा.

३ रा०—बरं तुझे डोळे कशानं फुटलेरे ?

आंधळा—माझ्या कर्मानं.

४ रा०—तर मग असं वाईट कर्म करणाराला चांगली

आंधळा—अहो पण इतकं धोपटायला मीं तुमचा

१ रा०—तूं वाईट कर्म करून, आंधळा झालास
आमच्या पाठींत दांडकं मारून आमची राजपुत्रांची बे
अपराध. म्हणून आह्मी तुला झोडपणार.

(त्याला पुन्हां मारतात. तोंच जयसेन येतो. त्यास प

जय०—कांरे बाबा ? तूं कोण आहेस आणि असा

आंधळा—महाराज, मी गरीब आंधळा आहें. वाट
दोघांचौघां भामट्यांनीं मला विनाकारण बेदम मारलं हो !

जय०—अरेरे ! ऊठ बरं ऊठ. मी तुला मार्ग दाखवि
या पुष्पाचा प्रभाव पाहण्यास ही संधि बरी आहे. (उघड)
गेलेली दृष्टि परत आणून दिली तर काय करशील ?

आंधळा—महाराज, आजन्म आपल्या चरणाचा द

जय०—पुढं ये पाहूं. (फूल लावतांच आंधळ्यास दिसूं लागतें.)

आंधळा—(पायां पडून) अहाहा ! महाराज, आपण मला आज पुनर्जन्म दिलात. आपले उपकार मी जन्मोजन्म विसरणार नाहीं.

जय०—बाबा माझे उपकार कसचे? ज्या सर्वशक्तिमान् परमेश्वराच्या कृपेनं हें फूल मला मिळालं, त्याचे उपकार मान; आणि सदांसर्वदां त्याच्या सेवेंत राहून आपल्या दृष्टीचा सदुपयोग कर. जा आतां.

आंधळा—छे! छे! महाराज, आतां हे चरण सोडून मी कुठेंही जाणार नाहीं.

जय०—तुझी इच्छा असेल तर चल, पण चांगल्या रितीनं रहा ह्मणजे झालें.

आंधळा—महाराज, त्याची आपल्याला मुळींच शंका नको.

१ रा०—अरे, हा चमत्कार पाहिलातना? त्या गृहस्थानं आणलेल्या फुलाच्या योगानं त्या आंधळ्याला दृष्टि आली.

२ रा०—तर मग मला वाटतं, आपली इतकी दुर्दशा उडाली तरी ज्याचा मागमूस लागला नाहीं, तें कुसुमचंपा फूल हेंच असावं.

३ रा०—मग चला. कांहीं तरी लटपट करून तें उपटश्यमे करूं या.

४ रा०—पण दादा, तो गृहस्थ कोण आहे समजलास कां ?

१ रा०—असेल कोणी भामटा नाहींतर सोदा.

२ रा०—अरे शहाण्याच्या कांद्या, आपल्याला नायकिणीच्या कारागृहांतून सोडविणारा तोच हा.

३ रा०—मग असेना. आतां त्याच्या बापाचे आपण काय लागतों ?

४ रा०—नकोरे बाबा ! त्यानं वाकड्या नजरेनं पाहिलें तर आपली पळतां पळतां तिरपिट उडेल.

१ रा०—पण तसं कशाला ? चला. मी एक दुसरीच युक्ति काढतों (जातात)

जय०—असो, त्या अवलियानं सांगितल्याप्रमाणं या पुष्पाचा अद्वितीय प्रभाव आहे खराच. आतां याच्या स्पर्शानं महाराजांना पूर्ववत् दृष्टि आली,

म्हणजे सर्व श्रमांचं सार्थक झालं. परमेश्वरा ! आज हा सुदीन तूंच मला द
विलास. हे तुझे उपकार किती वर्णावे.

पद (यह बदीमें पाया गम,)

हे प्रभो भक्तसुखकंद सच्चिदानंद । भवखंत हरिशि निभ्रां
ह्मणुनि किति संत धरिति स्वच्छंद ॥ तूं खरा दीनजन-त्रात
अति दुर्घट संकटहर्ता । ह्मणुनीच कुसुम मम हाता ।
तव कृपे येऊनी थोर । होत आनंद । यापरि प्रसंगीं मला
साह्य हो बहुत असे अघवृंद ॥

प्रवेश ४ था.

स्थळ--जंगल.

पात्रें--(तिघे राजपुत्र एका विहिरींचे कांठीं रडत बसतात व एक ल
रहातो, तोंच जयसेन व आंधळा येतात.

जय०—बाबांनो ! तुम्हांला असं रडायला काय झालं ?

तिघे—महाराज, आमचा भाऊ विहिरींत पडलाहो !

जय०—खरंच कीं काय ? थांबा तर. मी आतां त्याला वर काढतों. (पु
खालीं ठेवून विहिरींत डोकावतो, तोंच त्यास आंत ढकलून राजपुत्र फूल घेऊ
पळतात. नंतर आंधळा जयसेनास वर काढतो.)

२ रा०—(पळतां पळतां) दादा मला असं वाटतं, कीं आतां आप
साडेसाती संपली असावी. नाहीं तर बसल्या जागीं असा अलभ्य लाभ झा
नसता.

३ रा०—अरे म्हण आहेना ' असेल माझा हरी तर देईल विहिरीवरी. ' वे
आली तेव्हां पहा कसं फूल इथल्या इथंच सांपडलं; नाहीं तर उगीच वणावण
फिरलों, तुरुंगांत पडलों, मार खाल्ला.--

४ रा०—खाल्ला तो खाल्ला, पण हा फायदा तर झाला. बरं आतां चला. ते गृहस्थ वर नाहीं आला, तोंच आपण परभारें पावणेतेरा करूं या. नाहींतर इथंच्च बारा वाजतील.

पद (मजा उडावूं,)

हात्चलाखी करूनी कसें फशिवलें । वाहवा । थाप देवोनि फूल हें कसें पळिवलें । वाहवा । मोठें शूरत्व आमुचें । त्याला दाखविलें । वाहवा । आतां जाउं घरिं धावुनी । फूल नेत्रांस लावुनी । तात-दुःख आह्मि हरुनी । शाबासकी मिळवूं । हें पक्कें ठरलें । वाहवा ॥

अंक ४ था.

प्रवेश १ ला.

स्थळ—राजमहाल. (राजा, चौघे राजपुत्र, प्रधान, सेवक, इ०)

प्रधान—बरं महाराज, हें फूल तुम्हीं कुठें आणि कसं मिळवलं, तें सर्व सांगा पाहूं ?

१ रा०—तें कांहीं विचारूं नका बुवा, या कामीं आम्हांला जो कांहीं त्रास सोसावा लागला, त्याचं सविस्तर वर्णन करणं म्हणजे एक मला मोठा भारूड ग्रंथच होईल. मोऱ्या साफ करतां करतां—नाहीं—नद्या विहिरी शोधतां शोधतां आमच्या कमरेचे टाके ढिले झाले.

२ रा०—आणि फटके खातां खातां—नव्हे नव्हे—शत्रूकडील बाणांचा वर्षाव सोसतां सोसतां आमच्या पाठीला जखमा झाल्या.

३ रा०—खडी फोडतां फोडतां–छे, छे–मोठ्या हत्तीएवढे दगड इकडून तिकडे तिकडून इकडे फेकतां फेकतां, आमच्या हाताला घट्टे पडले.

४ रा०—मोटा ओढतां ओढतां–अँहं–राक्षसांचीं प्रेतं ओढतां ओढतां आमचे खांदे भरून आले.

प्रधान—कुणी मोटा ओढल्या म्हणतो, कुणी खडी फोडली म्हणतो, कुणी रस्ते झाडले म्हणतो, कुंणी फटके खाल्ले म्हणतो, तेव्हां यांनीं इतके दिवस खरोखरी काय काय धंदे केले, कांहीं समजत नाहीं. (उघड) महाराज, आपण प्रथम एक बोलतां आणि तें लगेच फिरवून सांगतां याचा अर्थ काय ? अँ ! कांहीं गुप्त मजकूर सांगायचा राहिला आहे कीं काय ?

१ रा०—अहो, पराक्रमाचं वर्णन थोडंथोडकं असतं कीं काय ? तें जुळून सांगतांना बोलण्याच्या गडबडींत पुढचं मागं आणि मागचं पुढं होतं.

प्रधान—असो. त्यांत कांहीं जास्त महत्त्व नाहीं. बरं महाराज, तुम्ही घरांतून बाहेर पडल्यावर प्रथम कुठं गेलांत ?

१ रा०—आम्ही जे इथून निघालों, ते थेट त्या यक्षकन्येच्या महालासमोर जाऊन उभे राहिलों.

२ रा०—त्यासरशीं त्या यक्षकन्येनं आम्हांला मोठ्या अदबीनं घरांत नेऊन राहण्याबद्दल फारच आग्रह केला. शेवटीं नाहीं होय करतां करतां एक आठवडा तिथं सक्तमजुरीनं–म्हणजे फार त्रासानं काढला. शेवटीं तिनं प्रत्येकाला आपल्या नांवाचं एकएक सुवर्णपदक बक्षिस दिलं आणि–

३ रा०—थांब, आतां मी सांगतों. पुढं जे निघालों ते थेट त्या फुलाजवळ जाऊन थडकलों. मग–

४ रा०—मग आम्ही त्या धटिंगणाची विहिरींत उचलबांगडी करतांच फुल घेऊन जें पलायन केलं ते थेट इथं आलों.

प्रधान—भले शाबास! याचं नांव शौर्य! मूर्ख बेटे कांहीं तरी गप्पा झोकतातहेत झालें. (तोंच राजा येतो त्याला पाहून) महाराजांची स्वारी आली.

राजा—अहाहा! प्रधानजी असा आनंदाचा दिवस मी डोळे भरून पाहीन, असं मला कांहीं वाटलं नव्हतं. खरोखर माझी कांहीं पूर्वपुण्याईच फळाला आली म्हणायची.

पद्य (श्रीधरा प्रभो धन,)

आजवरी अंध शापानें। बनुनी दुःखी होतों जरि मी। परि
श्रीहरिला येउनि करुणा। सतेजता या मम नेत्रांना।
दिधली कीं ही त्यानें। सुदिन दाविला ज्यानें मातें। वंदन
करितों मी त्या प्रभुतें। या समयीं प्रेमानें॥ आज०॥

प्रधान—महाराज, आपण म्हणतां तें खरं आहे. ही केवळ ईश्वराची कृपा. कारण दुर्मिळ वस्तु सहज लाभणं हा कांहीं लहानसहान चमत्कार नव्हे. तसंच आपल्या प्रियपुत्रांच्या शौर्याचीही मोठी तारीफच म्हणावयाची.

राजा—हो, तारीफ खरीच. कारण त्यांचे हातून हें बिकट कार्य पार पडेल असं मला कांहीं वाटलं नव्हतं. पण ती माझी कल्पना त्यांनीं खोटी ठरविली.

प्रधान—हे रडत राऊत कसे घोड्यावर बसले असतील, याची मला अझून देखील शंकाच आहे. (उघड) होय सरकार. आपल्या उदरीं जन्म घेतल्याचं यांनीं खरं सार्थक केलं.

राजा—म्हणूनच म्हणतों कीं यांच्या या अलौकिक कृतीचा जितका गौरव करावा तितका थोडाच आहे असं मला वाटतं.

१ रा०—यांत काय संशय! आमच्या अघटित कृत्याची सर्व जगांत कीर्ति वाजली पाहिजे.

२ रा०—अलबत, आमच्या पराक्रमाच्या अभिनंदनार्थ शहरांत जिकडे तिकडे गुढ्या-तोरणं उभारून उत्सव करण्याचा हुकूम सुटला पाहिजे.

३ रा०—आम्हांला हत्तीवर बसवून आमची धिंड-नाहीं वरात काढली पाहिजे.

राजा—प्रधानजी, यांच्या म्हणण्याप्रमाणं सर्व नगरांत द्वाही फिरवा. आणि या माझ्या प्रियपुत्रांना वस्त्रालंकारांनीं मंडित करून यांची जशी हौस असेल तसा यांचा गौरव करा. त्याचप्रमाणं ज्या अरण्यांत त्या दुष्ट कारस्थ्याचं मुखावलोकन करतांच मला अंधत्व प्राप्त झालं होतं, त्या अरण्यांत प्रथम उत्सवाची तयारी करा. कारण तेथील वनदेवतांना संतुष्ट करून नंतर येथील राजकीय उत्सवास आरंभ करावयाचा आहे.

प्रधान—आज्ञेप्रमाणं सर्व व्यवस्था करतों.

राजा—अहाहा ! बाळानो, तुमच्याकडे पाहिलं कीं मला पुन्हा पुन्हां तुमची स्तुती करावीशी वाटते. खरोखर—

पद [आदमने ये सिपत,]

**येउनि उदरीं सार्थक केलें । दुर्धर दुःखहि यत्नें हरिलें ॥
मृत मनुजाला संजिवनीनें । त्यासम तुमच्या या कुसुमानें ।
प्रियपुत्रांनो मज पतिताला। खचित गमे कीं प्राणचि दिधले ।
सौख्यतरु मन दग्ध होउनी । गेला असतां सुधा सिंचुनी ।
अतिसायासें तुह्मि या शुभदिनिं । पुनरपि त्याला अंकुर आणिले ॥**
[सर्व जातात.]

प्रवेश २ रा.

स्थल—वनप्रदेश. चंपा, व चौघे राजपुत्र.

चंपा— पद [श्रवणी पडो तव,]

फिरें मी ऐशी हा वेष धरोनी । मनाचा पुरा तो नेम करोनी । मदिय कुसुमचोर । दुःखा साहुनी । दिनरजनीं

शोधितसें। थांग न लागत । मन्मनिं भासत । निष्फल माझे यत्नहि सारे ॥ जाहले यास्तव उपाय न उरे । विविध विचारीं चित्त गुंतुनी जाय ॥ खरोखर० ॥

मग आतां करूं तरी काय ? ज्याचा मला सारखा निदिध्यास लागला आहे त्याचा शोध लागत नाहीं म्हणून निराशेनं माघारी जाऊं ? आणि तेंहि स्मशानवत् भासणाऱ्या त्या उद्यानांत ? छे ! छे ! सदोदित पूर्ण विकसित राहून माझं मन प्रफुल्लित ठेवणारं पुष्प जिथं नाहीं, आणि माझं मन चोरणारा चोरही मला सांपडत नाहीं, त्या ठिकाणीं परत जाऊन तरी काय सौख्य होणार ? बरं, पण आज कांहीं विशेष नसतां या शहरांतील लोक गुढ्या तोरणं उभारून मंगलवाद्यांचा गजर कां बरं करीत आहेत ? हे कोण ? कोणी सरदार लोक घाइघाईनं इकडेच येत आहेत, तर त्यांना विचारलं असतां सर्व समजेल.

१ रा०—अरे, शिकार करणं पुरे झालं. चला आतां सभा मंडपांत जाऊं.

२ रा०—छट्. आपण होऊन जायचं कीं काय ! पाहिजे तर प्रधानजी येतील आणि आपल्याला थाटामाटानं घेऊन जातील.

३ रा०—आणि ते विसरलेच तर ? मग सगळा उत्सव जाईल संपून आणि आपण मात्र वाट पाहतां पाहतां जाऊं कंटाळून.

४ रा०—काय ? प्रधानजी आपल्याला घेऊन जायला विसरतील ? त्यांची काय बिशाद ? फाशीच देऊन टाकीन, नाहींतर सुळावर चढवीन. आपण आतां छप्पन खून केले तरी आपल्याला माफ आहेत. कारण आम्ही महाराजांचं तसंच काम केलं आहे, चला. आतां त्या झाडाखालीं वाट पाहत बसूं.

(चंपा पुढं येऊन नमस्कार करते.)

१ रा०—कोणरे उद्धट मनुष्य तूं ?

चंपा—मी एक दूर देशचा प्रवासी आहें.

२ रा०—प्रवासी असलास म्हणून ? जरा लवून नमस्कार करतां येत नाहीं का ?

चंपा—शतमूर्खच दिसतात. (उघड) चुकलों महाराज, माफ करा.

३ रा०—पुन्हां चुकूं नकोस. पण कायरे, तूं दुसऱ्या देशचा प्रवासी असून आमच्या मुलखांत काय म्हणून फिरतोस ?

चंपा—महाराज, माझा एक जिन्नस चोरीला गेला आहे. म्हणून चोराचा तपास करीत फिरतों आहें.

४ रा०—मग ? तुझा जिन्नस आम्हीं चोरला आहे कीं काय ?

चंपा—छे. छे. तुम्हीं विचारलंत म्हणून मीं आपलं सहज सांगितलं.

१ रा०—असं, मीं ह्मटलं तुला कोणीं आमचं नांव सांगितलं कीं काय ?

चंपा—भलतंच महाराज, आपण असं नीच कृत्य कसं कराल ?

२ रा०—जा तर चालता हो. आमच्या राज्यांत राहूं नको.

चंपा—पण माझ्या मनांतून आपल्याला कांहीं विचारायचं आहे.

३ रा०—अरे चल. आम्हीं हलक्या सलक्या माणसांशीं बोलत नसतों.

४ रा०—फक्त आमच्या बरोबरीचा कोणी असला, तर शंभर प्रश्नांला एखादं उत्तर देतों.

१ रा०—त्यांतून बाबांचे डोळे बरे केल्यापासून आमच्या बोलण्याची किंमत फारच वाढली आहे.

चंपा—हीं सर्व थोरपणाचीं लक्षणें आहेत महाराज.

२ रा०—अरे ए; हा आपल्याला थोर गृहस्थ म्हणतो, यावरून हा कुणीतरी भला मनुष्य असावा. बरं कायरे ? तुला काय विचारायचं आहे?

चंपा—या नगराचं नांव काय ? आणि हा उत्सव कशाचा ?

३ रा०—इतकंच. ऐक तर. या नगराचं नांव चंडधारा नगरी. व आम्हीं इथल्या राजाचे शूर पुत्र आहोंत, आम्हीं मोठमोठे पराक्रम करून कुसुमचंपा नांवाचं फूल आणून आमच्या बाबांचे डोळे बरे केले, म्हणून हा उत्सव चालला आहे समजलास ?

चंपा—बरं, तें फूल कुठं सांपडलं, तें ठिकाण मला सांगतां का ?

४ रा०—कां ? तुझ्या बापाचे डोळे फुटले आहेत वाटतं ?

१ रा०—तर मग तें मिळविण्याचे भानगडींत तूं पडूं नकोस. कारण तूं कांहीं आमच्यासारखा पराक्रमी, हुशार, चतुर, शूर, दिसत नाहींस. बाबा, असलीं हीं धाडसाचीं, मार खायचीं कामं आमचे आम्हींच करूं जाणे.

चंपा—पण तें ठिकाण तर सांगा. प्रयत्न करून मिळालं तर नशिब माझं.

२ रा०—तर मग ऐक. एका मोठ्या भयंकर अरण्यांत एक भयंकर विहीर आहे, त्यांत एखाद्या माणसाला ढकलून दिलं. म्हणजे तें फूल आपोआप मिळनं. समजलं? जा आतां. चला आपणही जाऊं. (जातात.)

चंपा—या अजागळांच्या मूर्खपणाच्या भाषणावरून यांनींच फूल आणलं असेल, असं खात्रीनं कांहीं म्हणतां येत नाहीं. पाहूं बरं. (मुद्रिका पाहून) छेः मुद्रिकेंतील प्रतिमेप्रमाणं यांच्यांत एकाचाही चेहरा दिसत नाहीं. अहाहा ! काय हें रूप ! नाहींतर हे मेले माकडतोंडे बावळट ? पण जाऊं दे. यांच्या मागोमाग जाऊन उत्सवांत दंग असलेल्या नागरिक लोकांत आपण मिळावं, आणि व्यारकाईनं कांहीं शोध करावा. खरंच, माझा आशातंतु जो अगदीं निर्बल दिसत होता, तो यांच्या भेटीनं कांहींसा बळकट झाला. असो. चला आतां—

पद (वेणु वाजे,)

बरवें झालें इतुकें कळलें आलें धैर्य जरा तरि मातें । खचित त्वरित मम मन हें हरोनी । मज फसविलें पुष्पाहि नेलें,
शोधिन आतां त्यातें । अमित पतित मी नमित पदातें ।
श्रीजगदंबे माय शुभांगे साह्य करीं तूं हीतें ॥

प्रवेश ३ रा.

स्थळ—जंगल (राजपुत्र, तारा, पुरुषवेषधारी चंपा, जयसेन.)

तारा—(धांवत प्रवेश करून) महाराज, धांवा हो धांवा! ही तुमची तारा अनाथ गाईप्रमाणें या दुष्ट कसायांच्या हातीं जात आहे, तिला संकटांतून सोडवा हो सोडवा! हायरे देवा!

पद (अल्ला है ताला,)

आणिला हा घाला। त्रैलोक्यपाला। देवाधिदेवा दयाळा। दुष्टांनीं अधमांनीं रानीं या गांठोनी। छळिलें रे मजलागिं भारी॥ मज कोण तारिल। हें दुःख वारील। तुजवीण नच साह्यकारी॥

१ रा०—[धांवत येऊन] चला. धरा पकडा. आमचा डोळा चुकवून पळून जात होतीस नाहीं का? अग रांडे!

२ रा०—आम्हाला द्यूतामध्यें फसवून आमचा पैसा अडका लुबाडणारी तूंच नाहीं का? अग चोरटे!

३ रा०—आमच्याकडून मोऱ्या–गटारें साफ करून घेणारी तूंच नाहीं का? अग दुष्टे!

४ रा०—आह्माला हात हालवीत घालवून देऊन त्या गोऱ्या–गोमट्या भामट्यावर फुकट फिदा होणारी तूंच नाहीं का? अग टवळे!

तारा—महाराज, या घोर अरण्यांत माझ्या बरोबरच्या माणसांना ठार करून माझ्यावर अशी आग पाखडण्यासारखा मीं आपला अपराध तरी काय केला?

१ रा०—आम्हीं तुझ्या घरीं चालत आलों असून, तूं आमचा अंगिकार केला नाहींस, हा एक अपराध.

२ रा०—आह्मांला तुरुंगांत घातलंस हा दुसरा.

३ रा०—आह्मांला फटके मारविलेस, हा तिसरा.

४ रा०—आणि आमच्या मानेवर लाल लाल छाप मारलेस, हा चवथा.

१ रा०—असे हजारों अपराध केले आहेस. त्या सर्वांबद्दल तुला एकच शिक्षा सांगतों, ती तूं मुकाट्यानं भोगली पाहिजेस.

तारा—चला, दूर व्हा. ही गरीब अचला आडरानांत एकटी सांपडली आहे, तेव्हां मरणाच्या भयानं आपण सांगूं तसं ही ऐकेल, असं तुम्हाला वाटतं काय ?

१ रा०—वाटणारच. कारण तूं मुकाट्यानं नाहीं ऐकलंस तर आम्हीं तुला तें बळजबरीनं ऐकायला लावूं. या वेळीं तूं चांगली कचाट्यांत सांपडली आहेस.

तारा—आणि तुम्ही माझ्या तावडींत सांपडलां होतां, तेव्हां मी असंच कांहीं केलं असतं तर.

२ रा०—तूं काय कमी केलंस ? आमचे नानातऱ्हेचे धिंडवडे तर काढलेस.

तारा०—पण शेवटीं उदार बुद्धीनं तुम्हाला सोडून दिलं ना ?

३ रा०—मग आम्हींही आमची हौस पुरी करून तुला सोडून देऊं.

तारा—हें पहा, असं नुसतं तोंडानं बडबडणं सोपं आहे, पण प्रत्यक्ष कृति करतां फार कठीण जाईल. माझा प्राण गेला तरी तुमच्या हातीं लागायचं नाहीं असा माझाही निश्चय आहे. या बघूं, तुम्ही माझं काय करतां तें पहातें.

४ रा०—दादा, इच्या अंगांत बरंच अवसान आहेरे ! दाखवूं का इला अस्मादिकांचा तडाका ? [कंबर बांधतो.]

१ रा०—अहो शूर, जरा थांबा. तिच्याशीं धांगडधिंगा करण्यापेक्षां तिला गोंजारून घ्यावी हें मला बरं वाटतं. आणि तें काम अस्मादिक करणार. तुह्मी सर्व जरा आड उभे रहा.

तिघे रा०—आणि मग आह्मी पुढं येऊं केव्हां ?

१ रा०—ही ताळ्यावर आली म्हणजे मी हाक मारीन तेव्हां.

तिघे—आमच्या तोंडाला पानं पुसायचा दादाचा बेत दिसतो. (जातात.)

१ रा०—(जवळ जाऊन) हे चारुगात्री, खरंच सांग. तूं कांहीं आतां भिऊं नकोस. तूं आपल्या लव्याजम्यानिशीं इकडे कुठं चालली होतीस ?

तारा—चंद्रधारा नगरीला.

१ रा०—तिथं कोणाकडे चाललीस?

तारा—मी आपल्या प्रियकराकडे.

१ रा०—चंद्रधारा नगरींत तुझा प्रियकर कोण आहे ?

तारा—तेथील महाराजांच्या ज्येष्ठ पुत्राला मीं हा देह अर्पण केला आहे.

१ रा०—होय का ! अग तर मग तो मीच. ये माझे लाडके—

पद (अरे बोल सुंदरा,)

मी थोर नृपतिसुत आहे । मी थोर । रूपांत न्यून नच कांहीं । मजकडे पाहीं । जेवि रतिपती मदन त्या परी उभा असेच समोर । हा रंगेला जरी त्यागिसी मनीं करिसि मग घोर ॥

तारा—तुम्ही राजपुत्र असाल. परंतु मला पाहिजेत ते कांहीं तुम्हीं नव्हत.

१ रा०—त्याला काय शिंगं होतीं तीं मला नाहींत, म्हणून नव्हे म्हणतेस !

तारा—कुसुमचंपा फुलाच्या शोधाला जे गेले होते, त्यांच्याकडे मी जात आहे. समजलं आतां.

१ रा०—आतां काय सांगावं इला ! अग मीच त्या फुलाच्या शोधाला गेलों होतों. पाहिजे तर माझ्या धाकट्या भावांना विचार. (जाऊं लागतो.)

तारा—थांबा, थांबा. त्यांना विचारायचं तें माझ्या मनालाच विचारतें.

१ रा०—ठीक आहे. विचार तुझ्या मनाला. म्हणजे तुझीच खात्री होईल.

तारा—(स्वगत) आतां त्या सगळ्यांना इथं आणून आपली शोभा करून घेण्यापेक्षां कांहीं तरी युक्तीनं या मूर्खांची खोड जिरवली पाहिजे.

१ रा०—मग कसा काय ठरला विचार? मीच ना तो?

तारा—खरंच महाराज, आपणच ते. मीं इतका वेळ आपलं मन पाहिलं. म्हटलं आपल्याला माझी ओळख पटते कीं नाहीं तें पहावं. आपणच प्रथम माझ्या घरीं आलां होतां बरं.

१ रा०—अस्सं! आतां कशी आलीस वळणावर! चल ये. मला एकदां घट्ट आलिंगन दे बघूं.

तारा—रस्त्यांतच! वः असं जनावरासारखं वर्तन करणं राजेलोकांनां शोभत नाहीं. शिवाय आपल्या धाकट्या बंधूंनी पाहिलं तर काय म्हणतील!

१ रा०—तर मग आमच्या तंबूत चल, तिथं चांगला एकांत आहे.

तारा—छे! छे. अशा वेषानं तिथं जाणं गैरच. कारण, मी पडलें. जरा गोरी गोमटी. कुणीं सहज पाहिलं तर त्याची मजवर नजर जाईल.

१ रा०—तर मग कसं करूं म्हणतेस? मेणा, पालखी, घोडा, कांहीं आणूं?

तारा—तरी सुद्धां लोकांनां शंकाच यायची. हें पहा, त्या जाळीच्या आड चला. आणि माझं लुगडं आपण घेऊन आपला आंगरखा, पगडी, तलवार वगैरे सर्व मला द्या.

१ रा०—म्हणजे काय होईल?

तारा—व्हायचं काय? तुम्हीं व्हा बायको आणि मी होतें पुरुष.

१ रा०—काय मी बायको होऊं? अरे बापरे!

तारा—अरे बापरे काय! त्यांतच मजा आहे.

१ रा०—पण मी कधीं बायको झालो नाहीं नि आजच झालो, तर बायकोचे चाळे मला कसे येतील?

तारा—ते सगळे मी शिकवतें मग तर झालं.

१ रा०—बरं बुवा, होतो मी बायको, पण माझ्यावर कुणाची दृष्टी गेली तर.

तारा—उपयोग काय जाऊन. तुम्हीं म्हणजे ओबडधोबड दिपमाळ दिसाल. अर्थात तुह्मी कुणाच्या मनांत भरणार नाहीं, आणि मी पुरुष झाल्यावर माझ्यावर कुणाची नजर जाणार नाहीं. मग आपण खुशाल सर्वांच्या देखत तुमच्या तंबूंत जाऊन आनंद करूं.

१ रा०—भले शाबास! युक्ति पण युक्ति सोळा आणे युक्ति. चल तर लवकर वस्त्रं बदलूं. (जातात व चंपा येते.)

चंपा—या नागरिक जनांनीं जयसेन महाराजांच्या सांगितलेल्या हकीगतीवरून त्यांची माझी आतां भेट होईल, अशी कांहीं आशा वाटत नाहीं. जयसेन महाराज, क्षणैक देखील प्रत्यक्ष दर्शन न देतां आपण मला हें काय वेड लावलं आहे? आतां असं गुप्त तरी किती दिवस रहायचं?

पद. (शिव शिव सदा,)

शोधुनि तुह्मां विजन विपिनिं या ॥ कष्टविली बहु काया ॥ जनक-जननिही सोडुनि आलें ॥ धांवत मी या ठायां ॥ सकल सखिजनां अवमानोनी ॥ एकलि फिरतें वांया ॥ शूरा वीरा नृपतिकुमरा माझिया चित्तचोरा ॥ दीनावाणी विरह व्यसनीं लोटितां काय दारा ॥ आशापाशीं धरुनि इजसी गांजितां कां उदारा ॥ भेटोनियां कठिण समया दुःख माझें निवारा ॥ लोपुं न द्यावी माया ॥

अरे, असं साशंकित मुद्रेनं इकडे तिकडे पाहत, लपत छपत, हें जोडपं कोण येत आहे? प्रकार कांहीं विलक्षण दिसतो. आड उभं राहून पाहूं बरं.

(तारा व राजपुत्र वेष पालटून येतात.)

१ रा०—हँ, प्रिये, चल आतां लवकर.

तारा—हँ. हें काय भलतंच? आतां तुह्मी मला प्राणनाथ ह्मणायचं नी मी तुह्मांला प्रिये ह्मणायचं.

१ रा०—बरं, चलावं प्राणनाथ. पण कायग, मी या स्त्री-वेषानं कसा काय दिसतो ?

तारा—तें काय विचारावं, तुह्माला पाहून मोठमोठ्या तपस्व्यांचीसुद्धां गाळण उडायची. अहो ब्रह्मदेव चुकला नी तुह्मांला पुरुष केलं, नाहीं तर तुह्मी बायको झालां असतां तर फार शोभलां असतां.

१ रा०—तर मग मी फारच सुंदर दिसतों ह्मणायचा ?

तारा—होतर, पण पायांत तोडे नसल्यामुळं काहीच्याबाईच दिसतां.

१ रा०—दिसूंदे चल. मला आतां कुठें कुणाला भुलवायला जायचं आहे.

तारा—नसलं ह्मणून ? अशा भपकेदार लुगड्याला तोडे पाहिजेतच. चला. बसा खालीं. मी तोडे घालतें. (तारा त्याच्या पायांत तोडे घालते.)

चंपा—ही काय बरं भानगड असावी ? (निरखून पाहून) भले शाबास ! हा लुगडं नेसलेला पुरुष आहे वाटतं ! त्या पहा पदराखालीं लांब लांब मिशा दिसत आहेत. मला वाटतं, असं करण्यांत यांचा कांहीं तरी अनिष्ट हेतु असला पाहिजे. बरं, पुढं काय करतात तें पहावं.

१ रा०—अग पण हे तोडे खुपतात ना ? शिवाय कितीं तरी जड आहेत. छे बुवा ! माझ्यानं एक पाऊल सुद्धां उचलवणार नाहीं.

तारा—अहाहा ! उगीच मानभावीपणा करायाला नको. माझ्या तुरुंगांत सव्वामणाची बिडी अडकवून दिवसभर रस्ते झाडीत होतां ते ?

१ रा०—त्यावेळीं तशी संवय पडली होती, पण आतां ती मोडली.

तारा—थांबा तर. मी त्याला एक उपाय करतें. द्या पाहूं तो इकडे शेला.

१ रा०—हेंग काय ? कमरेला बांधायचा शेला पायाला काय बांधतेस ?

तारा—तोडे नवे असले नि ते खुपूं लागले, ह्मणजे आह्मी अशीच फडकीं बांधतों. (पाय बांधते.)

१ रा०—तर मग बेलाशक बांध. घट्ट बांध.

तारा—आतां नाहींना पायांना त्रास होत.

१ रा०—त्रास नाहीं होत ! पण आतां मला चालतां कसं येईल !

तारा—चालतां येऊं नये म्हणून तर हा बंदोबस्त (उघड) त्याची नको काळजी. मी तुम्हांला कडेवर घेईन. अगबाई ! तुमच्या हातांत बांगड्या नसल्या-मुळं हात अगदीं लांबच लांब सोट्यासारखे दिसतात.

१ रा०—दिसूं देत. मला कुठें हावभाव करायला जायचं आहे! मी पदरा-खाली झांकून घेईन.

तारा—छट्. विसरतेपणीं हात बाहेर राहिला नि कोणाला शंका आली, तर घोटाळा होईल. करा पाहूं हात पुढं. एके ठिकाणीं बांधून ठेवितें. (हात बांधते.)

१ रा०—ही तुझी बांधाबांधी संपणार तरी केव्हां ?

तारा—(स्वगत) आपला पक्का बंदोबस्त होईल तेव्हां.

१ रा०—म्हणजे ? तूं हें करते आहेस तरी काय ?

तारा—पुरुषाला बायको बनविण्याची ही एक खुबी आहे.

चंपा—(स्वगत) हात पाय बांधणारा हा पुरुष नसून कोणी स्त्री असावी. आणि या मुखाला युक्तीनं बांधून टाकण्याचा तिचा बेत दिसतो. (पुढं जाऊन) महाराज, आपण कोण ? आणि हें करतां काय ?

तारा—मी कोण, काय करतों, हें सर्व सावकाश सांगेन. पण तूर्त मी एका भयंकर प्रसंगांत आहें. मला साह्य करण्याचं वचन द्याल तर—

चंपा—ठीक आहे. हें घ्या वचन [वचन देते.]

तारा—चला तर. या अरण्यांतून मला मार्गाला लावा. (जाऊं लागतात.)

१ रा०—हेंग काय प्रिये ? तूं सांगितल्याप्रमाणं मी श्रृंगार करून बसलों आणि तूं चाललीस कुठं !

तारा—या शृंगाराला योग्य असा तुम्हांला नवरदेव शोधून आणतें.

१ रा०—मला नवरा नको आणि बायकोही नको! पण माझे हे चार हातांचे दोन हात कर एकदां. हाता–पायाला कळा लागल्या! मी पायां पडतों तुझ्या.

तारा—तसाच तडफडत रहा. येतें मी बरं राजश्री! रामराम.

१ रा०—हें पहा, मला फसगतीनं चतुर्भुज करून तूं जातेस, पण आरडा ओरड करून भांवांना हांक मारीन आणि रांडे तुझी खोड मोडीन. हां!

तारा—हूँ गप्प. ओरडशील किंवा अपशब्द काढशील, तर जागच्याजागींच ठार करीन (चंपेसह जाते व राजपुत्र येतात.)

२ रा०—दादा, आली कारे ती वठणीला! आतां येऊं कां आम्हीं!

३ रा०—कायरे! दादा कुठें दिसत नाहीं!

४ रा०—अरे ए, हें पाहिलंत का! या रांडेची दादानं पहा कशी पत्ती उडवून दिली आहे ती!

२ रा०—अरे होयरे होय! हें अडेलतट्टू वठणीला येईना, म्हणून त्यानं त्याला जेरबंद घालून, तो आपल्याला बोलवायला गेला; पण आपण इकडे आल्यामुळं त्याची व आपली चुकामूक पडली.

३ रा०—बरं झालं पडली तर. आतां आपण मजा करूं या. कायग रांडे, आतां तरी आम्हांला खुषीनं वश होतेस कीं नाहीं?

४ रा०—अरे, आतां खुषी नि नाखुषी विचारतां कशाला! भली कोलदांड्यांत सांपडली आहे, तोंच घ्या आपला सूड उगवून म्हणजे झालं.

२ रा०—कायग ए टवळे, आम्हीं जर आतां तुझे हात–पाय सोडले, तर तूं आमच्याशीं नीट गोडी–गुलाबीनं बोलशीलनां?

३ रा०—कांहीं दंगाधोपा करणार नाहींसना?

४ रा०—तुला मोकळी केल्यावर पळून जाणार नाहींसना?

२ रा०—तसं नको पण. आपण तिघे तीन बाजूला उभे राहूं आणि मग इला मोकळी करूं. (तिला सोडतात.)

३ रा०—हं. चल आतां उभी रहा. आणि सांग. आमच्यापैकीं तुला कोण आवडतो तो ?

४ रा०—असं कसंरे तुझं विचारणं ? बायका कधीं अमुक पुरुष आवडतो म्हणून उघड बोलून दाखवितात का ?

२ रा०—तर मग हिनं आपल्याला जो आवडत असेल त्याचा हात धरावा आणि खुशाल जावं. आह्माला तें कबूल आहे.

३ व ४ रा०—हें नाहीं आपल्याला पसंत. बस्स. (पदर ओढतात तोंच त्याचं तोंड दिसतं) अरे हा आमचा दादा ! भले शाबास दादा ! (तो पळतो, त्याच्या मागं सर्व जातात.)

प्रवेश ४ था.

(तारा, चंपा, व जयसेन.)

तारा—महाराज, खरोखर हे तुमचे फार उपकार झाले.

चंपा—यांत माझे उपकार कसचे ? तुह्मीच प्रसंगावधान राखून, त्या दुष्टाची मोठ्या चातुर्यानं खोड मोडून आपलं पातिव्रत्य आपण संरक्षण केलंत. पण बाई, आपण राहणार कुठल्या ?

तारा—महाराज, मी अलकावती नगरची राजकन्या आहें. कांहीं लोकांनिशीं आपल्या प्रियकराच्या शोधाकरितां फिरत असतां, मला त्या दुष्टानं गांठून माझ्या लोकांचा नाश करून माझी अशी दशा केली.

चंपा—अरेरे ! किती नीचपणा हा ! (जयसेन येतो.)

जय०—होय, तीच ही. (एकमेकांस ओळखून भेटतात.)

साकी.

हीच असे ती मम विरहानें तेजहीन झालेली ॥ मतिप्रिय तारा परि नकळे कां एकाकी ही आली। सोडुनि आप्तजनां। निर्जन ऐशा घोर वना ॥

चंपा—अरे ! ही बाई बेलाशक त्याच्या गळ्यांत जाऊन पडली हें आहे काय ?

जय०—कां बोलत कां नाहींस ? सांग, तुला कुणी इथं आणली ?

तारा—मला माझ्या प्राक्तनानं इथं आणली.

जय०—प्राक्तनाला दोष देण्यासारखं असं झालं तरी काय ?

तारा—सहा महिन्यांच्या आंत परत येतों असं सांगून फसवायचं, आणि झालं काय म्हणून विचारायचं, हेंच कां थोरांचं वचन ?

जय०—जोखमीच्या कामाकरतां गेल्यावर वचन कसं बरं पाळायचं ? प्रसंग-विशेषीं अधिक उणा वेळ लागतो.

तारा—आपण जातांना मला काय बरं सांगितलं होतं ?

जय०—कीं कुसुमचंपा पुष्प मिळतांच तुला येऊन भेटेन म्हणून.

चंपा—माझं पुष्प चोरून नेणारे हेच कीं काय ? (अंगठी पाहते.)

तारा—मग त्याप्रमाणं वर्तन झालं का ?

जय०—अग त्या फुलाच्या काय काय भानगडी झाल्या—

तारा—अग बाई ! मला तरी सांगा.

जय०—इकडे ये सांगतों. (तिच्या कानांत सांगतो.)

चंपा—होय. तेच हे. जाऊन एकदम कडकडून भेटूं का ? पण नको, हे काय काय बोलतात तें ऐकून नंतर त्याप्रमाणं वागावं हें बरं.

तारा—मग पुढं ?

जय०—अशा रीतीनं त्या पुष्पावतीच्या मदतीनं तें पुष्प मिळविल्यावर—

चंपा—अग रांडे पुष्पावती. माझ्या आश्रयाला राहून माझ्याशीं कपट अं ?

तारा--बरं मग पुढं काय झालं ?

जय०--पुढं तें पुष्प घेऊन ते पळून गेल्यावर मला बिचाऱ्या आंधळ्यानं विहिरींतून बाहेर काढलं.

तारा--बरं मग पुढं ?

चंपा—पुढं तुझं मढं. यांचं हें चऱ्हाट आतां किती लांबणार कुणाला ठाऊक ? पण आपण जिवाचा जळफळाट करून घेण्यांत काय अर्थ ! आतां हे या रानांत आहेत तोंपर्यंत आपण मनोवेगानं आपल्या घरीं जाऊन हम्मालीकडून या दोघां-नाही येथून अचानक उचलून न्यावं. तिथं गेल्यावर पुढचा विचार पुढं. तूर्त इतकं तरी छान झालं कीं—

पद (इष्कीयारा,)

ईशकृपेनें । नयनमनोहर । अभिनव सुंदर । हा मम प्रियकर । देखियला बाई । हा पुरुषवेष मी धरुनी फिरलें तत्सार्थक होई । जाउनि आतां हम्मालेला । कथुनि याला । निजसद-नाला । नेतें लवलांही ॥ मग यत्संगाला उत्सुक मन जें शांत-वीन तेंही ॥ (जाते.)

तारा—पण हें काय ? ईश्वरकृपेनं भयंकर प्रसंगांतून पार पडून पुष्प हातीं आलं, याबद्दल आनंद मानायचा सोडून चित्तवृत्ति अशी उदास कां ?

जय०-- पद (सखे शशिवदने,)

मला तें जाळी । बहु अधम बंधु मम कुसुम, नेति फस-वोनी । मन्मुखदूषण निरसायाची । दृढतर आशा होती साची । व्यर्थचि ती सगळी । मदिय यशाचा भागहि नेला । पुनरपि यत्नें मिळवायाला । साधन नच जवळी ॥

तारा—आपण कांहीं दुःख करूं नये. आपल्या बंधूच्या खोटेपणाबद्दल माझे-जवळ चांगला पुरावा आहे.

जय०—हं, तो कसा काय ?

तारा—माझ्यावर विश्वास ठेवून आपण तिथं चला म्हणजे सर्व कांहीं समजेल.

जय०—ठीक आहे. तुझी खात्री असेल तर चल. (जातात.)

प्रवेश ९ वा.

स्थळ—चंपेचा महाल. (चंपा, सख्या, जयसेन, तारा इ०.)

सखी—बरं सखे, मग पुढं काय झालं ?

चंपा—पुढं त्या स्त्रीनं त्या मूर्खाचे हात-पाय बांधल्यावर आम्हीं दोघी तेथून दुसऱ्या अरण्यांत आलों; तोंच एक राजपुत्र भेटला, त्याला पाहतांच तीः आपली एकदम जाऊन त्याचे गळी पडली.

सखी—हा मेल्यांनो ! म्हणजे ?

चंपा—म्हणजे काय ? तिचा प्रियकर तोच. आणि मी आंगठी निरखून पाहतें तों माझं पुष्प चोरून नेणाराही पण चोर तोच.

सखी—पण कायग ? त्या पुष्प चोराला तूं कोणती शिक्षा करणार ?

चंपा—मघाशीं सांगितली तीच. जा तुम्हीं आतां. त्याच तयारीला लागा. हम्माली त्या चोराला घेऊन आतां येईल (सख्या जातात व जयसेन तारेसह येतो.)

जय०—सखे सावध हो सावध हो ? अशी घाबरलीस काय ?

तारा—(सावध होऊन.) कोण, महाराज ? आपण एकाएकीं एकदम इथं कुठं आलों ! आणि आपल्याला आणलं तरी कुणी ?

जय०—(इकडे तिकडे पाहून) सखे, ज्या यक्षकन्येच्या बागेंतून मी कुसुम-चंपा पुष्प चोरून नेलं, तिच्या महालांत आपण उभे आहोंत. हा पहा भोंवता-लचा वनप्रदेश माझ्या अगदीं ओळखीचा दिसतो.

तारा—तर मग महाराज, आतां आपली कशी सुटका होणार ?

जय०--तूं अशी धीर न सोडतां इथं कुठं तरी दडून बैस. मी यक्षकन्येच्या परिजनांपैकीं कोणाला तरी गांठून सर्व समजून घेतों. (तारा लपून बसते.)

चंपा--(जयसेनास पाहून) अगबाई ! आपण कोण नी इथं कसे आला ?

जय०—हे उदार मनाचे यक्षकन्ये, मी कोण आहें, इथं कसा आलों व कशाला आलों हें तूं जाणत असून मला काय बरं विचारतेस ?

चंपा--ही असली मुग्ध भाषा मला समजत नाहीं. काय असेल तें स्पष्ट बोला नाहीं तर रक्षकांना हांक मारावी लागेल.

जय०—छे, छे, रक्षकांना हाक मारण्याचं कांहीं कारण नाहीं.

पद (रणधीरा,)

गुणसरिते हे मृगनयनि यक्षदुहिते । रति-मूर्ते । सुदति गुणसरिते । तव कुसुमा । मम कामा । नेलें ना-कथिलें जातां-ना ॥ अतिदीना । या अधमा । तादिय क्षमा-करिप्रेमा-धरुनी स्वमनीं । गर्जत सुयश जनीं । मळविं न त्या तव नामा । दे या दास। अभय मिळावें तूं विमल कीर्ति गुणसरिते ॥

चंपा--अहाहा ! इतके शूर, धैर्यवान् आणि चतुर असून अंगीं किती ही लीनता ? (उघड) उठा, उठा. घाबरूं नका. एकूण माझं पुष्प आपण चोरून नेलंत म्हणायचं ?

जय०-होय. आणि त्याबद्दल तूं देशील ती शिक्षा भोगण्यास मी तयार आहें.

चंपा--पहा बरं. नंतर पश्चात्ताप होईल. विचार करा.

जय०—छे. छे. कोणताही बिकट प्रसंग आला, तरी न भिण्याचा मीं निश्चयच केला आहे, सांग. कोणती शिक्षा करणार मला ?

चंपा--ऐका तर. आपल्याला प्रेमपाशांनीं बद्ध करावं आणि आजन्म या चरणांची दासी होऊन रहावं हीच. (हात जोडून बसते.)

जय०—हीच का शिक्षा ? मग असली खडतर शिक्षा कोणीही तरुण मनुष्य रोज देखील भोगण्यास तयार होईल. पण अशा हतदैव्याच्या पदरीं आपला देह अर्पण करून तुला काय सौख्य होणार ?

चंपा—सुख होवो अगर न होवो. ज्या दिवशीं माझ्या आवडत्या पुष्पाबरोबर माझं मनही चोरून नेलं, त्याच दिवशीं—

पद (जरि भेटाविलि,)

वाहिलि ही काया, पदीं गुणिराया । तेव्हां पासोनियां, फिरोनि आगें या, तुह्मां शोधाया । कष्टविली मी तनुहि प्रवासीं । सकल सुखाला मत्प्रिय जनालाहि सोडोनियां ॥ चाल ॥ परि मदिय श्रमाचें आज साफल्य झालें । सुमुख कमल बघुनी अंतरिं फार धालें । तरि गुणवंता माना ईश कांता सुवेळींच या ॥

जय०—वाहवा, हे उदार मनाचे यक्षकन्ये, धन्य तूं. मीं तुझ्याशीं कपट केलं असून तूं मजवर केवढा अनुग्रह केलास हा ! खरोखर मुद्रिकांची अदला-बदल करतांना माझं मनही तुझ्या ठायीं जडलंच होतं आणि—

साकी.

त्या दिवसापासुनि मम हृदयीं वास करिशि सखये तूं । आज परस्पर प्रीति जडोनी पुरला मनिचा हेतू । ये ये भेट मला । आणि भरती प्रीतीला ॥

तारा—(रागानं) तरी म्हटलं मला तिकडे कोपऱ्यांत कां दडपून ठेवली ? ही अशी रासक्रीडा करायला अडथळा येईल म्हणूनच ना ?

सखी—गडे चंपे, अशा सुखांत माती कालविणारी ही कोणग विघ्नसंतोषी ?

चंपा—गप्प बसा, आतां सर्व समजेल.

तारा—कां ? मी काय म्हणतें इकडे लक्ष आहे का ?

जय०—हो हो लक्ष आहे तर, चालूं द्या.

तारा—चालूं द्या काय? एवढ्याकरता कां मला इथं आणली?

जय०—अरे हो. मी विसरलोंच होतों.

तारा—दुसरी मिळाल्यावर विसर पडायचाच.

जय०—असं कुठं झालं आहे? (चंपेस) जा लौकर. तिला भेटून आधीं तिची समजूत कर बरं.

चंपा—पण त्या फार रागावलेल्या दिसतात.

जय०—भलतंच. तिची मुद्राच तशी रागीट; बाकी ती फार शांत, समजूत-दार आणि सरळ स्वभावांची बायको आहे.

चंपा—पण या वेळीं त्या आनंदानं मजबरोबर बोलतील असं कांहीं वाटत नाहीं.

जय०—(स्वगत) मलाही तशींच चिन्हं दिसतात.

चंपा—(तारेजवळ जाऊन) बाई, अशा कां उभ्या? (ती चंपेला दूर लोटते) हँ. हा सरळ स्वभावाचा पहिला झटका आहे वाटतं? बाई, असं काय करतां? मीं तुमचं काय केलं?

तारा—पुरे पुरे. चालूं द्या आपलं. रंगांत भंग करायला मी मधें कशाला?

चंपा—(जयसेनाजवळ जाऊन) ऐकलं कां? मी जवळ गेल्यामुळं त्यांच्या अंगाची अधिकच आग झाली आहे. आतां आपणच पहावं समजूत करून.

जय०—सुंदरी, हें काय बरं. अशी दांडगाई काय कामाची?

तारा—बरं हो बरं. मी आपली आहेच दांडगी; पण आतां मिळालीना चांगली पोक्त? घ्या आतां, तिलाच डोक्यावर बसवून घ्या.

जय०—माझ्या डोक्यावर ती नी तिच्या डोक्यावर तूं बैस, मग तरी झालं.

तारा—(रागानं) मला नाहीं असं खपायचं.

जय०—पण ती कोण आहे, याचा नीट विचार केलास का तूं?

तारा—ती इंद्राची रंभा असली तरी तुम्हांला; मला काय तिचं ?

चंपा—कांहीं नसो बिचारं, पण तुम्ही मला ओळखलंत कां ?

तारा—हो. हो. अगदीं पक्कं ओळखलं.

चंपा—सांगा तर मग कोण आहे मी ?

तारा—साळसूदपणानं माझी सुखसंपात्ति लुटणारी चोरटी.

चंपा—पण राजपुत्रांच्या तडाक्यांतून सुटायला या चोरटीचंच साह्य घ्यावं लागलं ?

तारा—(चपापून) म्हणजे ? पुरुषवेषानं येऊन तुम्हीच का साह्य केलंत ?

चंपा—होय, पण ते उपकार तुम्ही व्याजासह चांगले फेडलेत.

तारा—(शरमून) बाई, मी तुम्हाला ओळखलं नाहीं. मला क्षमा करा.

चंपा—तर मग काढा त्या कपाळाच्या आठ्या. त्या भिंवया नीट करा आणि दांत ओंठ न चावतां मला आपलीशी म्हणा बरं. ईश्वरी योजनेनं या आपल्या जन्माच्या गांठी पडून एका कुटुंबांत वागण्याचा प्रसंग आला आहे, त्यांत इकडचा काय बरं दोष ? विचार करा आणि मनांतला कुडा भाव, मत्सर-बुद्धि काढून टाका. मानवी स्वभावाची खरी परीक्षेची वेळ आतांच आहे.

जय०—म्हणूनच म्हणतों कीं, हा तुसडेपणा सोडून झटदिशीं समजुतीवर या बरं.

तारा—ही मी तयार आहें. (भेटतात.) बाई, मी तुम्हांला फार लावून बोललें, तें मनांत ठेवूं नकाहो. प्रसंगीं असंच करावं लागतं, नाहीं तर हे पुरुष डोक्यावर बसतात.

जय०—भले शाबास ! 'शिष्यापराधे गुरोर्दंडः' बरं चला. हें तुमचं तांत्रिक भांडण लवकरच मिटलं हें बरं झालं.

चंपा—आमचं भांडण ? छेः बाई. आम्हीं आतां एक विचारानंच वागणार !

जय०—तर मग हा त्रिवेणीसंगम आपण करणार.

चंपा—अशी थट्टा किती वेळ चालायची !

जय०--बरं चला. हें काम तर निर्विघ्नपणें तडीस गेलं, पण आतां पुढं ?

चंपा--आतां आपण खुशाल आनंदानं माझ्या घरीं रहावं.

तारा--नाहीं तर माझ्या घरीं चलावं.

जय०--वा ! नवऱ्यानं बायकोच्या घरीं राहणं म्हणचे मोठाच पुरुषार्थ ! ज्या राज्यांत माझा काहीं हक्क पोंचतो, तिथं मानमान्यतेनं रहाणं होईल अशीच कांहीं युक्ति काढली पाहिजे.

चंपा--ठीक आहे, तर मग चंडधारा नगरीशेजारीं मी यक्षप्रभावानं एक नगर उत्पन्न करतें. आपण तिथले राजे झाल्यावर माझे यक्ष प्रजा होतील. नंतर महाराजांनां चारी राजपुत्रांसह आपल्या नगरांत बोलावणं करून त्यांच्यासमोर सर्व गोष्टींचा निकाल करावा.

जय०--ठीक ठीक. ही छान युक्ति आहे. (जाऊं लागतो.) हो पण थांब. अजून एक महत्वाचं काम आहे. ती तुमची हम्माली राक्षसीण आहे ती !

तारा--कां ? तिच्यावरही आपलं लक्ष्य गेलं आहे वाटतं ?

जय०--छे, छे, तिच्या पुष्पावती नांवाच्या मुलीनं मला फार मदत केल्याचं तुला मीं सांगितलंच आहे, त्यावेळीं तिला माझं वचन गुंतलं आहे.

चंपा--असं का ! तर मग मीच तिला घेऊन येतें. (जाते.)

तारा--आणखी कुठं वचनं गुंतलीं असतील तर आतांच आठवण करावी.

जय०--म्हणजे ! तूं मला गोकुळांतला कृष्णच समजतेस वाटतं !

तारा--प्रत्यक्षच असतां समजूं कशाला ? हिला भेटायचं आहे, तिला वचन गेलं आहे, हें काय ! मनुष्याचं चित्त स्थिर पाहिजे.

जय०--पण तूं इतका हेवा कां करतेस ! मी शेंकडों जरी बायका केल्या तरी खरं प्रेम तुझ्यावरच. समजलीस ! बोलायचं नाहीं अं कुठं.

तारा--हो ! उगीच कुठं बोललें तर कदाचित् तें उडून जायचं.

जय०--पण आतां त्याचा वाद कशाला पाहिजे ! अनुभवाअंतीं समजेलच.

चंपा—(पुष्पावतीसह येते.) पुष्पावती, तूं जरी माझ्याशीं कपट केलंस, तरी ज्यांच्यासाठीं तूं इतके श्रम घेतलेस त्या रूपगुणसंपन्न महाराजांनीं माझा अंगीकार करून हा देह पावन केल्यामुळं मला जसा आनंद झाला, तसा तुला व्हावा अशी त्यांची फार इच्छा असून माझीही त्याला अनुकूलता आहे. तर आतां तुझ्या भेटीला उत्सुक असलेल्या त्या महाराजांना एकदां भेट बरं.

जय०—पुष्पावती, तुला दिलेलं वचन तर पूर्ण झालंच, पण तुझ्या संबंधानं या दोघींचा कसा काय विचार ठरतो तो पहा बरं.

चंपा—मी कांहीं आपल्या विचाराबाहेर नाहीं, पण मोठ्या बाईंचं कसं काय?

जय०—(तारेस) कसा काय आपला विचार ?

तारा—आधीं मनाप्रमाणं बेलाशक करायचं, आणि मग पोकळ मोठेपणा देण्यासाठीं माझा विचार घ्यायचा, असंच ना ? घ्या आणखी कुणी दहा पांचजणी बरोबर येत असतील तरी घ्या, माझी कांहीं मनाई नाहींहो.

जय०—असलं कुचकं बोलणं बोलायचं असेल, तर आम्हाला कशाचीच जरूर नाहीं. हे आम्हीं आपले एकटे फटिंगाप्रमाणं सुद्धां जाऊं; आम्हाला काय !

तारा—पुरे पुरे. इतकं रागवायला नको कांहीं.

जय०—आणि तुमचं तर कांहीं जमत नाहीं.

तारा—बरं, आम्ही दोघी जशा आतां बहिणीबहिणी झालों तशीच ही तिसरी. आम्ही सर्वजणी नेहमीं आनंदानं वागून इकडच्या सुखाकरतां प्रेमानं झटूं.

जय०—वहावा ! आतां कसं गोड बोललीस ? तुमचे हे समंजसपणाचे विचार ऐकून खरोखर मला अतिशय आनंद झाला आहे.

पद (जाहला मजवरि,)

ऐकुनी तुमचे हे असे सुविचार । मम हृदयीं तोष होत अनिवार । सुखद संसार । पुढति हो फार ॥
तारा—हेंच स्वमनीं, वागवोनी ॥

चंपा—राहुं आह्मी ॥
पुष्पा०—सवति मिळुनी ॥
तारा—प्रीतिनें ॥
चंपा—नीतिनें ॥
जय०—तेंव्हांच सुकीर्ति होईल सुजनीं ॥
तिघी—पुरविल आस ही तो जगदाधार ॥

अंक ५ वा.

प्रवेश १ ला.

स्थळ—महाल (जयसेन, प्रधान, राजा, चंपा, राजपुत्र वगैरे.)

जय०— (मोरे सैयांने,)

आलें दैवानें मोठें मज वैभव हें ॥ सुरूपसुगुणयुत गृहिणी तिघीही । रहाति प्रीतिनें जगिं भूषण हें । नृपपद हें अति दुर्लभ मनुजा । मदिय करीं ये ईशदयें ॥

प्रधान—महाराज, परमेश्वरी कृपा सर्वांवर असतेच, पण ती स्मरणारे मात्र थोडे असतात. असो. चार पुत्रांसह आलेल्या अतिपीड महाराजांना काय सांगायचं त्याची आज्ञा व्हावी.

जय०—प्रथम महाराजांचीच भेट घ्यावी असा माझा मानस आहे. तुह्मी स्वतः जाऊन त्यांना इथं घेऊन या. (तो जातो.) दैवा, प्रथमदर्शनीं माझं मुखावलोकन करतांच महाराजांची दृष्टि गेली तसा प्रकार पुन्हां मात्र न होवो. तुझ्या अगाध चक्रावर बसलेलीं आह्मी बाहुलीं आहों, पाडणं किंवा तारणं तुझ्याच इच्छेवर अवलंबून आहे. आजच्या भेटीनं घडेल तर राजसहवास नाहींतर ठरलाच आहे अरण्यवास ! (प्रधान राजास घेऊन येतो.)

जय०—(आदरानें त्यास बसवितो.) महाराज, हा कुमार वंदन करतो.

राजा०—आपण केलेलं स्वागत आपला मोठेपणा दाखवीत आहे. पण आश्चर्य हेंच कीं एका रात्रींत नगरासान्निध नगर वसवून माझा सत्कार करण्यांत उद्देश कोणता ? या अमानुष कृत्यानं आम्हीं भ्रमांत पडल्यासारखे झालों आहों.

जय०—हा परोपजीवी आणि भाग्यहीन कुमार आपल्याला संशयांत पाडण्याला कारण झाला, याबद्दल क्षमा करावी.

राजा—परोपजीवी आणि भाग्यहीन ! मग जगांत भाग्यशाली तरी कोण !

जय०—मातृपितृवात्सल्यांत दिवस कंठणारेच खरे भाग्यवान !

राजा—मग हें मायेचं नगर आपलं नव्हे तर !

जय०—नव्हे. चंपावती नामक यक्षकन्येनं कांहीं हेतुसिद्ध्यर्थ हें वसविलं आहे.

राजा—समजलों. कुसुमचंपा फुलाबद्दल सूड घेण्यासाठींच हें कारस्थान केलं असावं; पण इतकं करण्याचं कारण नव्हतं. जिच्या पुष्पानं मला पुनर्जन्म दिला, त्या यक्षकन्येचे मजवर उपकार आहेत. मला जर हें पूर्वींच कळतं, तर मोठ्या आनंदानं तिच्याजवळ क्षमा मागितली असती.

जय०—इच्छा असेल तर तीच आपल्या चरणांजवळ विनंति करायला येईल.

राजा—तिच्या दर्शनासाठीं माझं मन फार उत्सुक झालं आहे. पण मला मोठं आश्चर्य वाटतं कीं, दर्शनाला दुर्लभ अशी यक्षकन्या माझ्याजवळ विनंति कसली करणार ? अहो–या घटोत्कची मायेंतले–जांधीळ मामा ऊर्फ प्रधानजी, हें आहे तरी काय ?

प्रधान—सरकार, जसं हें नगर नवं तसे आम्ही प्रधानही नवे. तेव्हां आम्ही काय उत्तर द्यावं ? पण या पहा बाईसाहेबच आल्या. (चंपा येते)

राजा—हे रूपगुणसंपन्न यक्षराजकन्ये, ज्या तुझ्या कुसुमचंपा पुष्पानं माझी दिव्य दृष्टि होऊन हें तुझं दिव्य स्वरूप मी पहात आहें, त्या दृष्टीसह हें माझं मस्तक मी तुझ्या स्वाधीन करतों, तर जग तेजोमय आहे किंवा अंधकारमय आहे हें मला दाखविणं आतां तुझ्या स्वाधीन आहे.

चंपा—महाराज, हें काय बोलतां ? तें पुष्प सत्कारणीं लागल्याबद्दल मला उलट आनंदच होत आहे.

राजा—मग ही एवढी असुरी माया पसरण्याचा हेतु काय ?

चंपा—पुष्प नेतेवेळीं आपल्या शूर पुत्रांपैकीं ज्यांनीं आपल्या सर्वांगसुंदर देहाच्या प्रतिमेची मुद्रिका माझ्या अंगुलींत घातली, त्यांचं प्रत्यक्ष दर्शन घ्यावं आणि आपल्या परवानगीनं–(लाजते)

राजा—आलं लक्षांत. माझ्या पुत्राशीं लग्न करावं हाच हेतु दिसतो. वाहवा ! तुझ्यासारखी रूपगुणसंपन्न वैभवशाली सून प्राप्त होण्यांत मला मोठा आनंदच आहे. प्रधानजी, जा. माझ्या पराक्रमी पुत्रांना इकडे घेऊन या.

राजा—यक्षकन्ये, तुझं मन आकर्षण करण्यासारखे माझ्या पुत्रांच्या अंगीं असे कोणते गुण तुला दिसले !

चंपा—हजारो राक्षसांनीं वेष्टित असतां पुष्प नेण्याचं धाडस केलं, आणि माझ्या निद्रेचा भंग न करितां मुद्रिकांची अदलाबदल केली, यावरून ते खचित शूर, चतुर आणि धाडसी असले पाहिजेत. (प्रधान व राजपुत्र येतात.)

राजा—बाळांनो, सांगा पाहूं. तुमच्यापैकीं कुसुमचंपा फूल कोणी आणलं तें ?

१ रा०—बाबा, या प्रश्नाचा आतां आम्हाला अगदीं वीट आला आहे.

२ रा०—आणि उत्तर देतां देतां आमचा जीवही कंटाळला आहे.

३ रा०—माझ्यानं तर हा प्रश्न ऐकवतही नाहीं.

४ रा०—आणि माझ्यानं तर उत्तरही पण देववत नाहीं.

राजा—बाळांनो, असं भलतं सलतं भकूं नका. तुह्मांपैकीं कुणी आपली मुद्रिका तरी बदलली आहे का !

चौघे राज०—छेः हो. या पहा आमच्या मुद्रिका आमचेजवळ आहेत.

राजा—बरं,तुम्हांपैकीं हिला तरी कोणी ओळखतो का ?

१ रा०—(चंपेला पाहून.) छेः बुवा. हिला मीं कधीं पाहिलीहि नाहीं.

२ रा०—मीं कधीं ऐकिलीहि नाहीं.

३ रा०—मी कुठं वाचलीहि पण नाहीं.

४ रा०—मी कुठं लिहिली पण नाहीं.

राजा—अरे मूर्खांनो, मग तुम्हीं फूल आणलंत कुठून ?

१ रा०—फूल आणलं तेव्हां ही तिथं नव्हती, तो एकटाच होना.

राजा—एकटाच होता ? अरे एकटाच कोण ?

२ रा—ज्याच्यापासून पुष्प पळवून–नव्हे नव्हे मिळवून–आणलं, तो.

राजा—(स्वगत) अरे रे ! या कारस्थ्यांच्या कृतींत कांहीं तरी कपट आहे खास ! (उघड) हा घोंटाळा तरि काय आहे बाबा ? (जयसेन येतो.)

३ रा० –अरे बापरे ? हा इथं कुठून आला ? हा मेला होनाना !

४ रा०—अरे बाबा हे त्याचं भूत आहे भूत ?

१ रा०—मला वाटतं हा यमाचा दूत आहे दूत ?

२ रा—मग संभाळारे ? हा कदाचित् आपल्याला न्यायला आला असेल ?

चंपा—महाराज, आपण ही मुद्रिका न्याहाळून पाहिल्यावर एका क्षणांत सर्व आपल्या लक्षांत येईल.

राजा—ही प्रतिमा तर या राजाची दिसते.

जय०—होय सरकार.

राजा—मग ती या यक्षकन्येजवळ कशी व केव्हां गेली ?

जय०—पुष्प नेणारा कोण हें तिला समजावं, म्हणून मींच तिच्या करांगुलींत घातली.

राजा—म्हणजे ! पुष्प आणायला तूं गेला होतास कीं काय ?

जय०—होय महाराज.

राजा०—तूं पुष्प आणलं म्हणतोस तर तें या दिवस्यांच्या हातीं कसं गेलं ?

जय०—ती हकीकत फार शोचनीय आहे. ती त्यांनाच विचारा.

राजा—कायरे ! हा राजपुत्र काय म्हणतो ?

१ रा०—बाबा तो अगदीं खोटं बोलतो.

२ रा०—नव्हे. तो कांहीं तरी बडबडतो.

३ रा०—छे छे, तो सांगायला चुकतो.

४ रा०—अहो तो झोपेंत बरळतो.

राजा—हें पहा, अशी उडवाउडवीचीं भाषणं उपयोगी नाहींत. काय असेल तें खरं सांगा. तुम्हीं कुणाचा घातपात केला नाहींना !

१ रा०—छेहो बाबा ? घात केला असता तर इथं जिवंत कसा दिसतो !

राजा—अरे, हें तुम्हीं काय बोलतां तरी काय ? बऱ्या बोलानं खरं सांगतां कीं देऊं बक्षीस ! (तलवार उगारतो.)

१ रा०—भलत्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून आम्हांला मारायचं असलं तर मारा बुवा. म्हणजे तरी मनाप्रमाणं होईल.

२ रा०—हो. म्हणजे आम्ही केलेल्या श्रमाचं सार्थक होईल.

३ रा०—आणि आम्हीं तुमचे डोळे बरे केल्याचं चीज होईल.

४ रा०—हो. अशा रुल्यानं पितृवात्सल्यही दिसून येईल.

राजा—गप्प बसा मूर्खांनो ! राजा, तुला हें पुष्प आणायचं कारण ?

जय०—आपलं अंधत्व दूर व्हावं म्हणून.

राजा—माझ्या दृष्टीसंबंधानं तुला इतकी काळजी कां !

जय०—तसाच कांहीं आपला माझा हाडामांसाचा संबंध असेल म्हणून.

राजा—तुझा माझा काय संबंध आहे सांग पाहूं ?

जय०—त्या मुद्रिकेवरील नांव वाचलं म्हणजे ध्यानांत येईल.

राजा—(नीट पाहून) अतिपीड राजाचा पांचवा पुत्र 'जयसेन' अरे ! हें काय ! मी त्याज्य मानलेला पुत्र जयसेन तूंच काय ?

जय०—पित्याचं संकट दुसरा निवारील काय ! बाबा—

पद (कैसा अंधेरा,)

मी तोच आहें हो पापिष्ट मोठा। दुःख देता तुम्हांला अभागी। चरणसुदयें, राज्यपद हें, मिळुनि विनयें वसतों इथें । आतां लयालाहि गेला, खचित फेरा ग्रहांचाचि सारा। आज म्हणुनी, प्रेम धरुनी ठाव चरणीं, द्यावा झणीं ॥

राजा—बाळा ऊठ ऊठ, आतां गत गोष्टींबद्दल वाईट वाटूं देऊं नको. पण मला आधीं एवढं सांग कीं, तूं माझ्यासाठीं इतके श्रम घेऊन पुष्प आणलंस आणि मग तें यांच्या हातीं कसं गेलं !

प्रधान—दुसऱ्याचं उणं ते कधीं सांगणार नाहींत. आतां वेळ आली म्हणून मीच सांगतों. मी इतके दिवस जन्मांध होतों. आपल्या या पुत्रांची आणि माझी एका अरण्यांत गांठ पडली असतां यांनीं मला क्षुल्लक कारणावरून बेदम मार दिला. नंतर माझ्या सुदैवानं या दयाळु महाराजांनीं कुसुमचंपा फुलाच्या योगानं मला हें जग दाखविलं; तें पाहून आपल्या या पराक्रमी पुत्रांनीं कपटानं या महाराजांना विहिरींत ढकलून पुष्प पळविलं; त्या प्रसंगीं इश्वररूपेनं मीं यांचे प्राण वांचविले, आणि तेव्हांपासून मी याच चरणांची सेवा करून राहिलों आहें.

राजा—कायरे कारट्यांनो ! हे काय म्हणतात ?

१ रा०—ते म्हणतात आणि तुम्ही ऐकतां. अहो हा सर्व राक्षसी मायेचा खेळ आहे.

राजा—मला या वेळीं इतका संताप आला आहे, पण काय करूं, पुत्र पडलांत. नाहींतर या दुष्कृत्याबद्दल तुमच्या नरडीचा घोंटच घेतला असता.

जय०—महाराजांनीं जरा शांत व्हावं. आतां या चरणांजवळ विनंति इतकीच आहे, कीं आपल्या चरणकृपेनं परमेश्वरानं मला आणखी दोन स्त्रिया दिल्या आहेत त्या व माझं सर्व राजवैभव पाहून मला कृतार्थ करावं.

राजा—ठीक आहे. मी कांहीं तुझ्या इच्छेबाहेर नाहीं.

जय०—प्रधानजी, तारा व पुष्पावती यांस इकडे घेऊन या. (जातो.)

१ राज०—अरे बापरे! अरे ही तारा कोणती?

२ राज०—आपल्याला द्यूतांत जिंकून फटके मारले ती.

३ राज०—अथवा आपल्याला तुरुंगांत घातलं ती.

४ राज०—किंवा आपल्या मानेवर डाग दिले ती.

१ राज०—छे, ती कशाची इतके दिवस जिवंत राहते? त्या रानांत ती केव्हांच मेली असेल. (प्रधान व पुष्पावती येतात.)

प्रधान—सरकार, आज्ञेप्रमाणं धाकट्या बाईसाहेबांना घेऊन आलों. थोरल्या बाईसाहेब म्हणतात कीं, ज्या सभेंत माझ्या गुलामांचा सत्कार होत आहे, तिथं मला येणं शोभत नाहीं.

राजा—इथं गुलाम? या कारस्थ्यांनीं आणखी तर कुठं गुण उधळले नाहींत?

२ राज०—छेःहो बाबा, वारंवार गुण उधळायला काय आम्ही खुळे आहोंत?

राजा—नाहीं. दीर्घ शहाणे आहांत, माझी खात्री आहे. बाळा जयसेना, इथं गुलाम कोण आहेत?

जय०—प्रधानजी, इथं गुलाम कोण आहेत त्यांचीं नांवं विचारून या.

३ राज०—आतां गड्यांनो, ती आमचंच नांव घेणार!

४ राज०—आणि थोडीशी कुठं अब्रु उरली आहे, तीही जाणार!

१ राज०—इतकंच नव्हे तर तोंडाला काळं लागणार!

२ राज०—जसं करावं तसं भरावं, रडून काय होणार?

३ राज०—थांबा. ते प्रधान काय सांगतात तें ऐका.

प्रधान—(प्रवेश करून) त्या म्हणतात कीं, आपल्या डाव्या बाजूस बसलेले चौघे राजपुत्र माझे गुलाम आहेत.

४ राज०—पाहिलंत? बाबा, ही राक्षसी माया. आतां हे आम्हांला नुसते गुलाम म्हणतात आणि तें आपल्याला खरं वाटतं. पण कांहीं वेळानं हे म्हणूं लागतील कीं, तुम्हालासुद्धां लांब कान आणि शेंपूट आहे म्हणून.

राजा—गप्प बसा वात्रटांनो. प्रधानजी, जा. तिला म्हणावं कीं, तूं इथें प्रत्यक्ष येऊन हे कसे गुलाम आहेत तें सिद्ध करून दे.

१ रा०—आलीरे कंबक्ती, आतां येणार तारा नि आमचे वाजणार बारा.

२ राज०—यासाठीं आधींच करा इथून पोबारा.

३ राज०—पण आम्हांला गुलाम ठरवायला तारेजवळ पुरावा काय आहे ?

४ राज०—मानेवर डाग आहेत तो पुरावा थोडाच असेल. [तारा येते]

राजा—हे स्त्रिये, तूं कुणीही ऐस, पण मला प्रथम हें सिद्ध करून दे कीं, हे माझे पुत्र तुझे गुलाम कसे ?

तारा—महाराजांनीं त्यांच्या मानेवरील शिक्के पहावे म्हणजे खात्री होईल.

राजा—प्रधान, पहा बरं.

प्रधान—(पाहून) होय सरकार, 'तारेचे गुलाम' असे शिक्के आहेत खरे.

राजा—अहारे कुलांगारांनो.—

पद (कंठ चरचर,)

फुकट निपजुनि राजवंशीं कुलहि म झें बुडविलें। हें गुलामहि नांव अपुलें ठेवुनी कां घेतलें। जन्मुनी निज जनानिला तुम्हि कष्ट व्यर्थचि रे दिले। खचित जन्मा न येतां तरि दुःख नसतें वाटलें ॥

४ राजपु०— **पद** (हार मिले हाय,)

चुकलों आम्हि सर्व परी आज हें खरें ॥ छीः थू बहु जाहालीच अबुद्धी तुरे ॥ परि आतां प्रियताता बंधुराजरे ॥ स्वकिय दास मानुनियां पदरिं ठेविरे ॥

जय०—बाबा, यांच्या कोत्या समजुतीप्रमाणें यांच्या हातून पुष्कळ प्रमाद घडले. परंतु आतां कोप शांत करून त्यांच्यावर दया करावी, अशी माझी चरणांजवळ सविनय प्रार्थना आहे.

राजा—पण यांनीं सर्व वेडे चाळे सोडून तुझ्या आज्ञेंत राहिलं पाहिजे.

सर्व राज०—हो. हो. आह्मांला तें राज्य नको, वैभव नको, कांहीं नको. आम्हीं यांची सेवा करून राहूं.

जय०—मीही तुम्हांला आनंदांत ठेवीन.

राजा—अहाहा! बाळा, काय हे तुझ्या उदार व कोमल अंतःकरणांतील प्रौढ विचार! तुझ्या या गोड चरित्रापासून माझ्यासारख्या कोत्या समजुतीच्या वडिलांनीं चांगला बोध घेण्यासारखा आहे. तुझं मुखावलोकन करतांच मला अंधत्व प्राप्त होईल अशा वर्तविलेल्या भवितव्यतेला आळा बसविण्याकरतां मी मूर्खानं तुझ्या मातेचा व तुझा दुष्टपणानं त्याग केला. परंतु तूं आपल्या चातुर्यानं व पराक्रमानं माझ्या अंध दृष्टींत सूर्याच्या प्रकाशाबरोबर ज्ञानाचा देखील प्रकाश उत्पन्न केलास. अनेक दुर्धर प्रसंग सोसून आपल्या शरीराला क्लेश दिलेस. नीति व न्याय न सोडतां पुत्रवात्सल्य जागृत ठेऊन आपल्या मनाचा मोठेपणा जगाला दाखविलास. तसंच यांनीं आपल्या मोठेपणाकडे दुर्लक्ष करून, केवळ तुझ्या गुणावर लुब्ध होऊन तूं मित्रहीन व द्रव्यहीन असतांही तुला काया, वाचा, मनानं साह्य करून जगांतलि इतर कुलवतींना पातिव्रत्याचं उदाहरण दाखवलं, पण मी मात्र आजपर्यंत त्या पुत्रस्नेहास फाजील लुब्ध होऊन या बिन अकली व नीच कारस्थ्यांचं विनाकारण कौतुक करीत राहिलों, याबद्दल मला खेद होतो.

जय०—बाबा, आतां आपण झाल्या गोष्टीचा खेद मानूं नये. परमेश्वर. कृपेनं सर्व गोष्टी नीट जुळून आल्या याबद्दल प्रेमपुरस्सर त्याचे आभार मानून त्याच्या कृपाप्रसादानं हा, जो मला तीन स्त्रियांचा लाभ झाला आहे, त्याला अनुमति देऊन मंगल आशीर्वाद देणं हें आतां आपल्याकडे आहे.

राजा०—(तिघींचे हात जयसेनाचे हातीं देतो.) मुलींनो, आतां मी तुमचं काय प्रिय करावं?

ता॰चं॰पु॰— पद (जाऊं कामाला,)

भाग्यवान आम्हीं । पडलो थोर भूपसदनीं । कीर्ति दिगंतीं गाजे ऐसे श्वशुरराज असुनी । अतुल पराक्रमि तत्सुत प्रिय पति हे आमुचे सुगुणी । असतां काय उणें भुवनीं । भाग्य० ॥

॥ ईशस्तवन. ॥

श्रीदत्ता दे कर, लौकर, किंकर भवसागरि बुडतां ॥ पुराण-पुरुषा, पूर्णपरेशा, बा जगदीशा दिगंबरा । दीनोद्धारा, सौख्यागारा कृपासागरा जगताता । हा शरणाचि पामर यासी तूं त्राता, भगवंता ॥ श्री० ॥ स्वभक्तरक्षण, दीनदयाघन, पतितपावन ब्रीद आतां । निजदासांया, तें दाउनियां, श्रीगुरु-राया, सुखदाता । ही निरसावि मायाबंधाचिगाथा । तत्त्वता । श्रीदत्ता० ॥ चित्सुखकंदा, ब्रह्मानंदा, मतिमंदाची ही सेवा । प्रेमें घ्यावी, मान्य करावी, शांति असावी मच्चित्ता । ने निजपदिं अंतीं, आस न अन्यथा । गुरुनाथा ॥